


# हॅलो प्रभात

नवे विचार...नवी सुरुवात

RNI NO. MAHMAR/2020/79996

■ संपादक : संजीव शाळगावकर

■ मुंबई ■ पुणे ■ अहिल्यानगर ■ कोल्हापूर ■ सातारा ■ सांगली

पुणे • वर्ष : ०६ • अंक : २६७ • बुधवार, दि. ३१ डिसेंबर २०२५ • किंमत : ३ रूपये • पाने : ४


## अक्षता तेंडुलकरांची वॉर्ड क्रमांक १९२ मधून माघार

**मुंबई : हॅलो प्रभात**

भाजपच्या अक्षता तेंडुलकर यांनी महानगरपालिका निवडणुकीतून माघार घेतली असल्याची माहिती समोर आली आहे. भाजप नेत्या अक्षता तेंडुलकर यांनी शिवसेनेच्या चिन्हावर लढण्यास नकार दिला. वॉर्ड क्रमांक १९२ मधून शिवसेनेने त्यांना लढण्याची ऑफर दिली होती. मात्र कमळ वगळता दुसऱ्या चिन्हावर लढण्यास अक्षता तेंडुलकर यांनी नकार दिला आहे. आज उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख होती. तिढा असलेल्या जागांसाठी पक्षांनी प्रयत्न केले, काही ठिकाणी बंडखोरी देखील झाली, दरम्यान वॉर्ड क्रमांक १९२ भाजपला मिळावा यासाठी त्यांनी प्रयत्न केले मात्र, शिवसेनेने हा वॉर्ड भाजपला न देता थेट शिवसेनेच्या चिन्हावर अक्षता तेंडुलकर यांना उमेदवारी देऊ केली, पण त्यांनी ती नाकारली. त्यांनी निवडणुकीतून माघार घेतल्याचं त्यांच्या सोशल मिडीयावरून सांगितलं आहे.

# अजितदादांकडून तुरुंगातील 'गुन्हेगारांना' उमेदवारी ?

### उमेदवारांच्या निवड प्रक्रियेवर नागरिकांचा सवाल

**पुणे : हॅलो प्रभात**

पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून पुण्यातील गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या बऱ्याच उमेदवारांना तिकीट देण्यात आले असून यातील काही जण सध्या येरवडा कारागृहात शिक्षा भोगत आहेत. अनेक सामाजिक कार्यकर्ते आणि सर्वसामान्य नागरिकांनी मात्र उमेदवारांच्या निवड प्रक्रियेवर सवाल उपस्थित करून या भूमिकेचा तीव्र निषेध केला आहे. पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत उमेदवारी वाटपावरून मोठा वाद निर्माण झाला आहे. अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींना उमेदवारी दिली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचा कानोसा घेतला असता पुण्यातील कुख्यात बंडू आंदेकर टोळीतील लक्ष्मी आंदेकर आणि सोनाली आंदेकर यांना पुणे महापालिका प्रभाग क्रमांक २३ मधून उमेदवारी देण्यात आली आहे. या दोघी आयुष कोमकर हत्या प्रकरणात तुरुंगात आहेत, तसेच त्यांच्यावर बेकायदा फ्लेक्स लावणे, अतिक्रमण करणे आणि खंडणी मागणे असे गुन्हे दाखल आहेत. संपूर्ण आंबेकर घराण्याची पार्श्वभूमी गुन्हेगारी प्रवृत्तीची असून याचा फटका अजितदादांच्या पक्षाला बसेल असे भाकीत काही राजकीय विश्लेषकांनी केले आहे.

हत्या प्रकरणातील बंडू आंदेकरने पुणे महापालिका निवडणुकीसाठी अर्ज दाखल केला. त्याच्या कुटुंबातील सोनाली आंदेकर आणि लक्ष्मी आंदेकर यांनीही अर्ज दाखल केला होता. त्यांना कोणत्या पक्षाकडून उमेदवारी दिली जाणार, याबद्दल उत्सुकता होती. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी ती बाब समोर आली दोघींच्या उमेदवारीबद्दल गुप्तता पाळण्यात आली होती. पण, वकील आला आणि त्याने एबी फॉर्म दिला. त्यानंतर बातमी फुटली.

आयुष कोमकर हत्या प्रकरणातील बंडू आंदेकर, खंडणी प्रकरणातील सोनाली आंदेकर आणि लक्ष्मी आंदेकर हे तिघे तुरूंगात आहेत. त्यांनी महापालिका निवडणुकीसाठी अर्ज दाखल केला. विशेष न्यायालयाने दिलेल्या निकालानंतर भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालयात जाऊन तिघांनी उमेदवारी अर्ज भरला होता.

बंडू आंदेकरसह लक्ष्मी उदयकांत आंदेकर आणि सोनाली वनराज आंदेकर या तिघांना न्यायालयाने सशर्त अर्ज दाखल करण्यास परवानगी दिली होती. २७ डिसेंबर रोजी तिघांनी अर्ज भरला. गुन्हेगारी पार्श्वभूमीमुळे त्यांच्या उमेदवारीबद्दल गोपनीयता बाळगण्यात आली होती. मंगळवारी (३० डिसेंबर) अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी आंदेकरांचे वकील आले आणि त्यांनी एबी फॉर्म दाखल केले. लक्ष्मी आंदेकर आणि सोनाली आंदेकर यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून उमेदवारी देण्यात आल्याचे समोर आले. बंडू आंदेकर हा आयुष कोमकर हत्या प्रकरणातील आरोपी आहे. तर सोनाली आणि लक्ष्मी यांच्याविरोधात ५ कोटी ४० लाख खंडणीचा गुन्हा आहे. तिघेही सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत.



### गजा मारणेच्या पत्नीलाही उमेदवारी

**राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाने गुंड गजा मारणे याची पत्नी जयश्री मारणे हिलाही उमेदवारी दिली आहे. त्यामुळे तीन गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या व्यक्तींना उमेदवारी दिल्याने राष्ट्रवादी (अजित पवार) वादात सापडण्याची चिन्हे आहेत.**

## संक्षिप्त...

### 'आरपीआय'च्या वाट्याला ९ जागा

**पुणे : हॅलो प्रभात**

महानगरपालिका निवडणुकीत भाजप आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) यांची युती असून पक्षाला पुणे महानगरपालिका निवडणुकीत ९ जागा मिळाल्याची माहिती शहराध्यक्ष संजय सोनवणे, प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे. प्रभाग क्रमांक १ मध्ये अश्विनी राहुल भंडारे, प्रभाग २ अ – रेणुका चलवादी, प्रभाग २ ब – सुधीर वाघमारे, प्रभाग ६ संतोष आरडे, प्रभाग ७ निशा मानवतकर, प्रभाग ८ परशुराम वाडेकर, प्रभाग १३ निलेश आल्हाट, प्रभाग १४ हिमाली कांबळे आणि प्रभाग २२ मधून मृणाली बापू कांबळे यांना उमेदवारी मिळाली आहे. पुढे प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे की, भाजपकडे आम्ही १५ जागांची मागणी केली होती, वाटाघाटी मध्ये भाजपाने आम्हाला ९ जागा दिल्या आहेत. यामध्ये ६ पुरूष आणि ३ महिलांचा समावेश असून सामजिक संतुलन राखण्यात आले आहे, आरपीआयच्या उमेदवारांमध्ये ५ बौद्ध, ३ मातंग आणि एक धनगर उमेदवार आहे.

### पुण्यात शेवटच्या दिवशी अर्जांचा पाऊस

**पुणे : हॅलो प्रभात**

पुणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ साठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी आज इच्छुकांनी मोठी गर्दी केली होती. आज ३० डिसेंबर रोजी एकूण २२९८ नामनिर्देशन पत्रे दाखल झाली आहेत. निवडणुकीच्या रणधुमाळीत आतापर्यंत एकूण ३०४१ उमेदवारांनी आपले नशीब आजमावण्यासाठी अर्ज सादर केले आहेत. राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार जाहीर झालेल्या या निवडणुकीसाठी पुणे महानगरपालिकेने ४१ प्रभागांतील १६५ जागांसाठी १५ निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालये स्थापन केली आहेत. आज दुपारपर्यंत उमेदवारांची मोठी रांग लागल्याने, दुपारी ३ वाजेपर्यंत कार्यालयात उपस्थित असलेल्या सर्व उमेदवारांचे अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया उशिरापर्यंत सुरू होती.

### जानेवारीत रेल्वेचा मोठा ब्लॉक

**पुणे : हॅलो प्रभात**

पुणे रेल्वे विभागातील प्रवाशांसाठी महत्त्वाची बातमी आहे. दौंड-काष्टी दरम्यान सुरू असलेल्या दुहेरीकरण प्रकल्प आणि नॉन-इंटरलॉकिंग कामासाठी रेल्वे प्रशासनाने ४ ते २५ जानेवारी २०२६ या कालावधीत विशेष पॉवर ब्लॉक जाहीर केला आहे.

## सेम टू सेम आर्ची! आर्चीसारखी दिसणारी उमेदवार कोण?

**पुणे : हॅलो प्रभात**

राज्यातल्या महत्त्वाच्या महानगरपालिका निवडणुकांपैकी मुंबई आणि पुणे महानगरपालिका निवडणुकीकडे सर्वांचं लक्ष आहे. कोणता पक्ष कुणासोबत युती करतो, कुणाशी फारकत घेतो, हे आता स्पष्ट झालेलं आहे. या निवडणुकांमध्ये इतरही अनेक मुद्दे चर्चिले जात आहेत.



त्यातच पुण्यातल्या प्रभाग क्रमांक सातमधल्या उमेदवाराची चर्चा होतेय. प्रभाग क्रमांक सातमधून 24 वर्षीय अंजली ओरसे यांनी राष्ट्रवादी पक्षाकडून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये सर्वात कमी वयाच्या उमेदवार म्हणून त्यांच्याकडे बघितलं जातं. सोमवारी त्यांनी वडिलांच्या आणि कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. गोखले नगरची कन्या म्हणून अंजली यांची ओळख आहे.

भाजपने विकासकामे केली नाहीत, त्याचा फटका आम्हाला बसला, विकासकामांसाठी मी निवडणुकीच्या रिंगणात उतरले असल्याचं अंजली यांनी सांगितलं. विनोद ओरसे हे माजी नगरसेवक असून त्यांची मुलगी अंजली ही आता राजकारणात उतरली आहे. विशेष बाब म्हणजे सैराट चित्रपटातल्या आर्चीसारखं दिसणाऱ्या अंजली यांनी प्रभागामध्ये जाऊन विकासकामांचा आढावा घेत समस्या जाणून घेतल्या. राष्ट्रवादी पक्षाकडून त्यांनी उमेदवारी दाखल केली आहे. लोकांमध्ये भाजपविरोधात मोठा रोष आहे, विकासकामे केले नाहीत त्यामुळे त्याचा फायदा मला नक्कीच होईल, असा विश्वास अंजली यांनी व्यक्त केला.

# येरवडा क्षेत्रीय कार्यालयासमोर सावळा गोंधळ!

### उमेदवारी अर्ज भरण्यासाठी उमेदवारांसह कार्यकर्त्यांची गर्दी

**पुणे : हॅलो प्रभात**

पालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस असल्याने येरवडा क्षेत्रीय कार्यालयाबाहेर निवडणूक कार्यालयात सावळा गोंधळ दिसून आल्याचे चित्र दिसून येत असताना अशा कार्यकर्त्यांना आटोक्यात आणण्यास पोलिस यंत्रणेला यश आले.

पुढील महिन्यात होणाऱ्या पालिका निवडणुकीचे उमेदवारी अर्ज भरण्याचा मंगळवार हा शेवटचा दिवस असल्यामुळे येरवडा_धानोरी_कळस क्षेत्रीय कार्यालयासमोरच सकाळपासून उमेदवारी अर्ज भरण्यासाठी अनेक उमेदवारांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.अनेक उमेदवारांना विविध पक्षाची उमेदवारी मिळाल्यामुळे फटाक्याच्या आतषबाजीत व पदयात्रा काढून अनेक उमेदवारांनी अर्ज दाखल केले असले तरी पण सकाळपासूनच कार्यालयाच्या अनेक पक्षातील कार्यकर्त्यांची मोठ्या प्रमाणात गर्दी दिसून येत असताना अनेक दुचाकी कार्यकर्त्यांनी रस्त्यावरच उभ्या केल्यामुळे पुणे-नगर महामार्गावर वास्तुक कोंडीचे चित्र पाहायला मिळाले. तर परिसरात काही अनुचित घटना घडू नये.याकरिता येरवडा पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अंजुम बागवान यांच्या मार्गदर्शनाखाली कडक पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.मात्र हजारोंच्या संख्येने परिसरात कार्यकर्त्यांचा जमाव जमल्याने तो पांगविण्यासाठी पोलिस यंत्रणेला कसरत करूनच पांगविण्याची वेळ आली.तर उमेदवारांच्या प्रवेशामुळे क्षेत्रीय कार्यालयात मोठ्या प्रमाणात जमाव जमला होता.क्षेत्रीय कार्यालयात अपुऱ्या जागेमुळे या ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणावर जाण्यासाठी उमेदवारांसह कार्यकर्त्यांना कसरत करण्याची वेळ येत होती.सकाळपासून ते संध्याकाळपर्यंत परिसरात मोठ्या प्रमाणात गर्दी दिसून येत होती.तर उमेदवारीचा अर्ज स्वीकारण्याची वेळ तीन वाजेपर्यंत असताना देखील संध्याकाळपर्यंत उमेदवारांनी अर्ज भरण्यासाठी धावपळ सुरू होती.तर निवडणूक आयोग अधिकारी सचिन बारवकर यांनी देखील उमेदवारांनी दिलेले अर्ज स्वीकारण्यास प्राधान्य दिले.कार्यालयाच्या आवारात शाब्दिक वाद सुध्दा पाहायला मिळाले.क्षेत्रीय कार्यालयात थोड्या थोड्या फरकाने उमेदवारांना कार्यालयात सोडण्यात येत होते.यावेळी अनेक उमेदवारांनी पक्षाकडून एबी फॉर्म भेटल्यावर पक्षाचे झेंडे फडकावत व फटाक्याची आतषबाजी करत आपला आनंद साजरा करून जल्लोष केला.यामुळे परिसरात उमेदवारी मिळालेल्या उमेदवारांमध्ये उत्साहाचे वातावरण दिसून येत होते.तर उमेदवारी न मिळालेल्या उमेदवारांमध्ये नाराजीचे सूर उमटले होते.त्यामुळे क्षेत्रीय कार्यालय परिसरात उत्साहाचे वातावरण दिसून आले.



## रात्रीत चित्र बदलले; कोथरूडमध्ये भाजपकडून 'डॅमेज कंट्रोल'

**कोथरूड : हॅलो प्रभात**

'पुण्यवंत पाताळलोकी नेला' या संत जनाबाईंच्या अभंगाचा दाखला देत, 'निष्ठावंतांना डावलले गेले' असा सूर भाजपच्या गोटातून उमटू लागला होता. यामुळे निवडणुकीत विपरीत परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाल्याने पक्षाची 'डॅमेज कंट्रोल' करणारी यंत्रणा तातडीने सक्रिय झाली. वरिष्ठ पातळीवर चक्रे फिरली आणि रात्रीतून कोथरूडमधील उमेदवारांचे चित्र बदलले. पक्षाची परिस्थिती मजबूत असतानाही बाहेरून उमेदवार आयात केल्यामुळे निष्ठावंत कार्यकर्ते आधीच अस्वस्थ होते. उमेदवारांची यादी जाहीर होताच अनेक कार्यकर्त्यांना अश्रू अनावर झाले, तर काहींना मानसिक धक्का बसला. काही ठिकाणी संतापलेल्या कार्यकर्त्यांनी नेत्यांविरुद्ध घोषणाबाजीही केली.

तरीही, अनेक इच्छुकांनी 'कायम निष्ठावंत' असे संदेश समाजमाध्यमांवर प्रसारित करून आपण पक्षाच्या निर्णयासोबत असल्याचे जाहीर केले होते. काही उमेदवारांनी बंडखोरी करत अर्ज दाखल केला असला तरी त्यांना देखील समजावून पक्षाची एकजूट कायम ठेवण्याचा पक्ष नेतृत्वाचा प्रयत्न असेल.

### उमेदवारी अर्जात झालेले बदल

- **प्रभाग ३१: भाजपचे कोथरूड मंडल अध्यक्ष निलेश कोंढाळकर यांची जाहीर झालेली उमेदवारी रद्द करण्यात आली. त्यांच्या जागी माजी नगरसेविका हर्षाली माथवड यांचे पती दिनेश माथवड यांना उमेदवारी देण्यात आली.**
- **हर्षाली माथवड यांच्या जागी पक्षाचे ज्येष्ठ कार्यकर्ते जगन्नाथ कुलकर्णी यांच्या पत्नी ज्योत्स्ना कुलकर्णी यांना संधी देण्यात आली.**
- **प्रभाग ११: शिवसेनेच्या वैशाली मराठे यांच्यासाठी सोडलेल्या जागेवर आता मनीषा बुटाला यांना उमेदवारी देण्यात आली आहे.**
- **यथावत उमेदवारी: माजी नगरसेविका वासंती जाधव आणि शिवसेनेतून भाजपमध्ये आलेले पृथ्वीराज सुतार यांची उमेदवारी कायम ठेवण्यात आली आहे.**

## अभिवादन सोहळ्यासाठी पाच हजार पोलिसांचा कडक बंदोबस्त

**पुणे : हॅलो प्रभात**

'कोरेगाव भीमा विजयस्तंभ अभिवादन सोहळ्याच्या ठिकाणी पुणे ग्रामीण पोलिसांकडून पाच हजार पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. तसेच सर्व सोहळ्यावर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर राहणार आहे', अशी माहिती पुणे ग्रामीण पोलिस अधीक्षक संदीपसिंग गिल यांनी दिली. विजयस्तंभ अभिवादन सोहळ्याच्या निमित्ताने ग्रामीण पोलिस कडक बंदोबस्त करणार आहेत. गुरुवारी (१ जानेवारी) होणाऱ्या या अभिवादन सोहळ्यात राज्यभारातून अनुयायी उपस्थिती लावणार आहेत. या पार्श्वभूमीवर गर्दीचे नियोजन, वाहतूक बदल तसेच अनुयायींची गैरसोय होणार नाही, याची काळजी घेतली जाणार आहे, असे गिल यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

'गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा अभिवादन सोहळ्यास जास्त गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यादृष्टीने पोलिसांनी बंदोबस्ताचे नियोजन केले आहे. वाहनतळ, वाहतूक बदलाबाबतचे नियोजन करण्यात आले. अग्निशमन दल, रुग्णवाहिका, राष्ट्रीय आपत्ती निवारण पथक (एनडीआरएफ), बॉम्बशोधक व नाशक पथक (बीडीडीएस), शीघ्र कृती दल (क्यूआरटी) तैनात असणार आहे', असे त्यांनी नमूद केले. अभिवादन करण्यासाठी राज्यासह देशभरातील अनुयायी कोरेगाव भीमा येथे येत असतात. यातून खासगी



वाहनाने येणाऱ्यांची संख्या मोठी आहे. यापार्श्वभूमीवर पोलिसांनी वाहनतळाची व्यवस्था उपलब्ध करून दिली आहे. वक्फ बोर्ड येथील वाहनतळ, टोरँटो पार्कींग, इनामदार पार्कींग येथे ४०० बस लावण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. वाहनतळाच्या परिसरात देखील पोलिस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. 'कोरेगाव भीमा परिसरातील गर्दीचे नियोजन करण्यासाठी ड्रोन कॅमेरे वापरण्यात येणार आहे. सीसीटीव्ही कॅमेरे पोलिस नियंत्रण कक्षाशी (कंट्रोल रूम) जोडण्यात आले आहेत. नियंत्रण कक्षातून गर्दीचे नियोजन करून बंदोबस्तावरील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सूचना देण्यात येणार आहेत. अनुयायांसाठी जागोजागी पोलिस मदत केंद्र सुरू करण्यात येणार आहे. नगर रस्ता, पेरणे फाटा परिसरात गर्दीवर लक्ष ठेवण्यासाठी तात्पुरते मनोरे उभे करण्यात आले आहेत', असे गिल यांनी सांगितले

# उत्तुंग सांस्कृतिक भरारीचं सरतं वर्ष!

**नवी दिल्ली : हॅलो प्रभात**

विकसित भारताचं उद्दिष्ट गाठण्यासाठी केंद्र सरकारनं सरत्या वर्षात विविध उपक्रम राबवले आहेत. हे वर्ष भारतासाठी सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाचं ठरलं. जगभरात भारताची वेगळी सांस्कृतिक ओळख निर्माण करण्यात यावर्षी देशाला यश आलं आहे.

सरत्या वर्षात प्रयागराज इथं भरलेला कुंभमेळा हा जगातला सर्वात मोठा धार्मिक सोहळा ठरला. जवळपास ६६ कोटी भाविकांनी कुंभमेळ्यात सहभाग घेतला. यामुळे श्रद्धा, अध्यात्म आणि परंपरा यांचं अद्वितीय दर्शन जगाला झालं. याच वर्षी अयोध्येतल्या श्री राम मंदिरावर धर्मध्वजारोहण सोहळा झाला. देशाच्या सांस्कृतिक पुनरूत्थानाचं हे प्रतीक असल्याचं मानलं जात आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत झालेल्या या सोहळ्यात देशभरातून भाविक सहभागी झाले होते. यासोबतच ५२४ वर्षं जुन्या त्रिपुर- सुंदरी मंदिराचा पुनर्विकास यावर्षी पूर्ण झाला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत पुनर्विकसित मंदिराचं उद्घाटन झालं. चोल सम्राट राजेंद्र चोल प्रथम यांच्या सागरी मोहिमेला एक हजार वर्षं पूर्ण झाल्यानिमित्त प्रधानमंत्र्यानी गंगईकोंडा चोलपुरम इथं भेट दिली आणि भारताच्या नौदल पराक्रमाच्या वारशाचा गौरव केला. राष्ट्रीय गीत वंदे मातरमच्या दीडशेव्या वर्धापनदिनानिमित्त देशभरात कार्यक्रम साजरा झाले. प्रधानमंत्र्यांनी दि. ७ नोव्हेंबरला या कार्यक्रमाचं औपचारिक उद्घाटन केलं.



त्याचप्रमाणे यावर्षी पिपरहवा इथून भगवान गौतम बुद्ध यांचे पवित्र अवशेष भारतात परत आणण्यात आले. १२७ वर्षांनंतर हे अवशेष परत आणून भारताच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेला उजाळा देण्यात आला.

## शिंदे गटाच्या नेत्याची बंडखोरी

**मुंबई : हॅलो प्रभात**

मुंबई महापालिका निवडणुकीसाठी भाजप आणि शिवसेना यांच्यात युती झालीय. एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेला ९० जागा मिळाल्या आहेत. तर भाजप १३७ जागांवर निवडणूक लढवणार आहे. आज उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज शेवटचा दिवस होता. राजकीय पक्षांकडून उमेदवारांना एबी फॉर्मचं वाटप करण्यात आलं. ज्यांना उमेदवारी मिळाली नाही त्यांनी बंडखोरी केली. वॉर्ड क्रमांक २५ मधील चित्रही सारखेच ठरले. भाजपकडे जागा गेल्याने शिवसेना नेत्यानं बंडखोरी केली आहे. भाजपनं या ठिकाणी अभिनेत्री निशा परुळेकर यांना उमेदवारी दिली होती.




# मुंबईचा महापौर मराठीच !

आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत आता मराठी अस्मिता आणि महापौरपदावरून राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. त्यातच आता मनसे नेते संदीप देशपांडे यांनी मुंबईचा पुढचा महापौर हा मराठीच असेल आणि तो ठाकरेंच्या विचारांचाच असेल, असा निर्धार व्यक्त केला आहे. यावेळी संदीप देशपांडे यांनी प्रचारादरम्यान भाजपवर परप्रांतीय महापौर बसवण्याचा घाट घातल्याचा खळबळजनक आरोप केला. मनसेने वॉर्ड क्रमांक १९२ मधून यशवंत किल्लेदार यांना तिकीट दिले आहे. त्यांचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी अनेक कार्यकर्ते-पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी संदीप देशपांडे यांनी भाजपवर टीका केली.

मराठी माणसाची एकजूट : मराठी माणसाची ही एकजूट पाहून विरोधकांच्या पोटात गोळा आला आहे. महापालिकेत भ्रष्टाचाराचा डोंगर उभा करणाऱ्यांना आता घरचा रस्ता दाखवण्याची वेळ आली आहे, असे संदीप देशपांडे म्हणाले.

भाजप आमदार अमित साटम यांनी मनसे आणि ठाकरे गटावर मामू अशी टीका केली होती. त्याला प्रत्युत्तर देताना देशपांडे यांनी नवीन शब्द वापरत भाजपचा समाचार घेतला. अमित साटम आणि त्यांचे सहकारी हे पमू लोक आहेत. त्यांना मुंबईच्या विकासापेक्षा परप्रांतीयांच्या मतांचे राजकारण महत्त्वाचे वाटते. भाजपची रणनीती पाहिली तर मुंबईत परप्रांतीय महापौर करण्यासाठी ते हालचाली करत आहेत, पण आम्ही ते कधीही होऊ देणार नाही, असे संदीप देशपांडे यांनी ठणकावून सांगितले.

महानगरपालिकेच्या आगामी गणितांवर भाष्य करताना संदीप देशपांडे यांनी मोठा दावा केला. यावेळी माहीम विधानसभा क्षेत्रातून ठाकरे बंधू राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या विचारांचे ६ नगरसेवक निवडून येतील. मुंबईची सत्ता कोणाच्या हातात द्यायची, हे आता मुंबईकर मराठी माणसाने ठरवले आहे. मुंबईचा महापौर मराठीच होणार, हे आता सूर्यप्रकाशाइतके सत्य आहे," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. दरम्यान आगामी महानगरपालिका निवडणुका केवळ सत्तेचे समीकरण नसून, ती महाराष्ट्राच्या अस्मितेची आणि वर्चस्वाची लढाई ठरत आहे. मुंबईसह २९ महत्त्वाच्या महापालिकांच्या या रणधुमाळीत युती, आघाडी आणि पक्षांतर्गत नाराजी पाहायला मिळत आहे. तर दुसरीकडे प्रत्येक प्रभागात उमेदवारी अर्जांच्या शेवटच्या दिवशी झालेली गर्दी आणि नेत्यांमधील शाब्दिक युद्ध पाहता, ही निवडणूक येणाऱ्या काळातील राज्याची राजकीय दिशा ठरवणार असल्याचे बोललं जात आहे.

मुंबई नेमकी कोणाची? : मुंबईवर गेली पंचवीस वर्षे सत्ता असणारी उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना अजून अंधारातच चाचपडत आहे. निवडणूक आली, की मुंबई, मराठी माणूस, महाराष्ट्र या गोष्टींची आठवण या मंडळींना होते. मग विरोधक कसे या गोष्टी संपवत चाललेले आहेत असा आरोप केला जातो. पण, ज्यावेळी सत्ता हातात येते त्यावेळी मात्र नेमका मराठी माणसाचा विसर पडतो. पूर्वी, उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे या मुद्द्यावर ठाम होते, मात्र मराठी माणूस कुणामुळे मुंबईच्या बाहेर गेला याचे उत्तर मात्र त्यांच्याकडे नाही. त्यांचाच प्रतिस्पर्धी भाजपा हा इतर प्रांतातील नागरिकांचे लागूनचालन करतो, असे आरोप करणारे स्वतः मात्र त्यावर उत्तर शोधत नाहीत. मुंबईतला मराठी माणूस बाहेर का निघून जातो याचे उत्तर ठाकरे बंधूंकडे नाही.

मुंबई दहशत कोणाची? खंडणी वसुली कोणाची? याचे उत्तर आता मराठी माणूसच देणार आहे. मुंबईतील नागरी गुण्यागोविंदाने राहतात हे न पहावणारे मराठी आणि परप्रांतीय असा भेद करत तर नाहीत ना, याचे उत्तर ही निवडणूक देईल. अर्थात, पक्ष कोणताही सत्तेवर आला तरी महापौर हा मराठीच होईल हे वेगळे सांगायला नको! कोण्या देशपांडे यांची त्यासाठी मुळीच गरज नाही.

# पुण्यात 'भाजप'चा प्रताप?

**पुणे : हॅलो प्रभात**



■ उमेदवारी जाहीर होण्यापूर्वीच एबी फॉर्म वाटप

पुणे महापालिका निवडणुकीसाठी इच्छुकांची मोठी संख्या लक्षात घेता भाजपमध्ये बंडखोरी होऊ नये, यासाठी उमेदवारी यादी जाहीर न करता थेट उमेदवार निश्चित करून एबी फॉर्म देण्याची रणनीती पक्षाने अवलंबल्याचे समोर आले आहे. मात्र, तरीही भाजपमध्ये संभाव्य बंडखोरीची शक्यता कायम असून, त्याची झलक सोमवारी पाहायला मिळाली. केंद्र व राज्यात सत्तेत असलेल्या भाजपकडून महापालिका निवडणुकीसाठी मोठ्या प्रमाणावर इच्छुक आहेत. १२० हून अधिक जागा जिंकण्याचे लक्ष्य ठेवत ज्या प्रभागांमध्ये भाजपची ताकद कमी आहे, त्या ठिकाणी इतर पक्षांतील प्रभावी नेते व इच्छुकांना पक्षात प्रवेश देण्यात आला आहे. यात राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) तसेच काँग्रेसमधील काही नेत्यांचा समावेश आहे. यामुळे स्थानिक आमदार व कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर भाजपच्या कोअर कमिटीच्या बैठकीत स्थानिक आमदारांचा विश्वास घेऊन उमेदवारांची नावे निश्चित करण्यात आली. ही यादी प्रदेश कार्यालयाकडे पाठवण्यात येणार असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अंतिम मंजुरी देणार असल्याचे सांगण्यात आले. तसेच शिवसेना व आठवलेंच्या रिपब्लिकन पक्षालाही काही जागा सोडल्या जाणार असल्याने भाजप नेमक्या किती जागांवर निवडणूक लढवणार, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.

दरम्यान, एकमत झालेल्या उमेदवारांची यादी प्रथम २६ डिसेंबर रोजी प्रसिद्ध होईल, अशी चर्चा होती. मात्र त्यानंतर ही यादी २८ डिसेंबर रोजी रात्री जाहीर केली जाणार असल्याचे सांगण्यात आले.

उमेदवारी जाहीर झाल्यानंतर पक्षातील नाराजांचा रोष वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन 'कमळाबाई'ने संभाव्य बंडखोरी टाळण्यासाठी थेट फोन करून उमेदवारांना एबी फॉर्म देण्याची भूमिका घेतली. प्रत्येक प्रभागात सरासरी ३० इच्छुक असल्याने उमेदवारी न मिळालेल्यांची संख्या मोठी आहे.

# राजकारण : सेवा करता करता श्रीमंत होण्याचा धंदा

**हॅलो प्रभात**



हभप शिवाजी चौगुले

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बराच काळ रखडलेल्या निवडणुका होत असल्यामुळे त्याविषयी राजकीय पक्षांना प्रचंड उत्सुकता आहे. या निवडणुका स्थानिक पातळीवरील असल्यामुळे त्यात स्थानिक पदाधिकाऱ्यांना जास्तीत जास्त संधी मिळावी यासाठी सगळ्याच पक्षांचा प्रयत्न असतो. पण राजकीय पक्षांची आणि त्यांच्यातील इच्छुकांची जी काही जीवघेणी चढाओढ सुरू आहे, ती पाहिल्यावर जनसेवेसाठी या मंडळींना किती तळमळ आहे ते दिसून येते. पण अलीकडच्या काळात राजकारण ही केवळ जनसेवा राहिलेली नाही. त्या माध्यमातून प्रचंड आर्थिक उलाढाल होत असते. त्यामुळे जनसेवेसोबत त्यात बरीच आर्थिक गणिते दडलेली आहेत. कारण सत्तेतून पदप्राप्ती आणि त्यातून पैसा अशी ही साखळी आहे. जेव्हा निवडणुका जवळ येतात, तेव्हा एकाच पक्षातील अनेकजण निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक असतात. एकाच वॉर्डात एकाच पक्षातील अनेक इच्छुक असतात, तेव्हा त्यांना तिकीट देणाऱ्या पक्षप्रमुखांसमोर किंवा ज्येष्ठ नेत्यांसमोर मोठे आव्हान उभे राहते. कारण तिकीट देताना पक्षात इच्छुकांची नाराजी वाढली तर बंडखोरी होण्याची भीती असते. आपल्याच पक्षाचे उमेदवार एकमेकांना पाडण्याची शक्यता असते. काही वेळा तर नाराजीमुळे पक्ष फुटण्याची शक्यता असते. याविषयीची शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन पक्षांची अलीकडची उदाहरणे आहेत. त्यामुळे निवडणुकीच्या तोंडावर पक्षातील इच्छुकांना आवरणे आणि ज्यांना तिकीट मिळाले नाही, त्यांना सावरणे हे पक्षाच्या मुख्य नेत्यांसमोर आव्हान असते.

आपल्याकडे लोकशाही शासनप्रणाली असल्यामुळे सगळ्यांनाच निवडणूक लढवण्याचा हक्क आहे. त्यामुळेच आपल्याकडे राज्यातच नव्हे तर देशभरात पक्षांचे पीक आलेले दिसते. असे इतर कुठल्याही लोकशाही शासनप्रणाली असलेल्या देशांमध्ये दिसणार नाही. आपल्याकडील राजकीय पक्षांची निर्मिती पाहिली की, त्याला राजकीय दुकानदारी हाच शब्द लागू पडतो. कारण ज्याला वाटले त्याने आपले स्वतंत्र दुकान उघडले. त्यामध्ये मूळ पक्ष आणि त्याची विचारधारा यांच्याशी निष्ठेचा काही प्रश्नच उरत नाही. राज्यातील महत्त्वाच्या महानगरपालिकांच्या निवडणुकांचे अर्ज भरण्याची आज शेवटची तारीख आहे. पण शेवटच्या क्षणापर्यंत पक्षप्रमुख आणि इच्छुकांच्या पोटात गोळा आलेला आहे. कारण ज्यांना तिकीट दिले जाणार नाही, ते काय करतील याचा भरोसा नाही. निवडणुकांच्या तोंडावर ज्यांनी पक्षातून त्याग करून जिकडे संधी मिळेल तिकडे धाव घेतली हे पाहिल्यावर राजकारण हा निष्ठेचा प्रांत राहिलेला नसून तो आज संधीसाधूंचा मेळा झाला आहे, असे खेदाने म्हणावेसे वाटते. कारण कालपर्यंत विरोधक म्हणून एकमेकांवर टीका करणारे आज एकमेकांच्या गळ्यात गळे घालून हात उंचावून दाखवताना दिसतात. त्यामुळे जनतेला काय वाटेल, ते आपल्याला काय म्हणून मतदान करतील, याची अजिबात खंत या मंडळींना वाटत नाही. आज महाराष्ट्राचे चित्र जरी बघितले तरी असे दिसेल की, २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात राजकीय पक्षांची जी फोडाफोडी झाली, ज्या युती आघाड्या झाल्या, ते पाहता पद आणि पैशासाठी नेते मंडळी काहीही करू शकतात. राज्य पातळीवर शिवसेना आणि काँग्रेस यांची हातमिळवणी होईल, याची कुणी कल्पनाही केली नव्हती, पण ती झाली. पुढील काळात शिवसेना ही उद्धव ठाकरे यांच्याकडून आणि राष्ट्रवादी काँग्रेसही शरद पवारांकडून हायजॅक केली जाईल, याचीही कुणी कल्पना केली नव्हती, पण तसे झालेले दिसले.

लोकशाही शासनप्रणाली ज्या देशांमध्ये असते तिथे राजकीय पक्ष, त्यांचे नेते, जनता ही लोकशाहीसाठी परिपक्व असावी लागते. लोकशाही शासनप्रणाली ही ब्युफे पद्धतीच्या जेवणासारखी असते. तिथे तुमच्यासमोर विविध पक्वान्ने मांडून ठेवलेली असतात. त्यातून तुम्हाला तुमच्या ताटात तुम्ही स्वतःहून हवे तेवढे वाढून घ्यायचे असते, पण आपल्याकडे बरेच लोक आपल्या ताटात भरभरून वाढून घेतात, त्यांच्याकडून तितके खाल्ले जात नाही, त्यामुळे ते फेकून देतात. त्यामुळे अन्न वाया जाते. त्यामुळे अशा लोकांना पंगत बसवून तुला किती किती हवे हवे, ते विचारून वाढावे लागते. आपल्याकडील एकूणच राजकीय आणि सामाजिक परिस्थिती पाहिल्यावर ब्युफे पद्धती इतकी आपल्याकडे परिपक्वता आलेली नाही, असेच म्हणावे लागेल. तसे नसते तर आज उमेदवारी मिळवण्यासाठी पक्षापक्षांमध्ये जी झुंबड उडालेली दिसत आहे, ती दिसली नसती. निवडणुकीच्या तोंडावर लोकही विविध प्रलोभनांना बळी पडले नसते. राजकारणाच्या माध्यमातून विकासाचे विविध प्रकल्प राबविले जातात, पण या प्रकल्पांच्या माध्यमातून स्वतःच गडगंज श्रीमंत होण्याची स्पर्धा लागते. त्यामुळे राजकारण हा गरीबांची सेवा करता करता श्रीमंत होण्याचा फायदेशीर धंदा आहे, असे म्हटले जाते ते काही खोटे नाही. आपल्या देशात लोकशाही शासनप्रणाली जशी पुढे जाईल, तसे राजकीय पक्ष, नेते आणि लोक अधिक परिपक्व होत जातील, असे मानले जात होते. आता जनसेवेच्या नावाखाली उमेदवारी मिळविण्यासाठी जीवघेणी चढाओढ सुरू आहे, ती पाहिल्यावर खरी लोकशाही रुजण्यासाठी अजून खूप प्रयत्न करावे लागतील असे वाटते. राजकारण हे जनसेवेचे माध्यम असायला हवे, तो पैसा कमावण्याचा धंदा बनू नये. नाही तर पक्षांमधील फुटी आणि एकमेकांवर केल्या जाणाऱ्या कुरघोड्या यात लोकांच्या हिताचे विकास प्रकल्प भूईसपाट होतील. रस्त्यावरील खड्डे कधीही बुजणार नाहीत.

# राऊतांनी प्रचारासाठी बांगलादेशच्या पंतप्रधानांना बोलवावे

**मुंबई : हॅलो प्रभात**

■ नवनाथ बन यांची बोचरी टीका



हिरव्यांची गुलामी करणा-या उबाठा गट, संजय राऊत यांनी महापालिका निवडणुकीदरम्यान पक्ष प्रचारासाठी पाकिस्तान, बांगलादेशच्या पंतप्रधानांना बोलवावे, असा घणाघात भारतीय जनता पार्टीचे माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन यांनी मंगळवारी केला. संजय राऊत हे भारतात राहून देशविरोधी भूमिका घेणारे पाकिस्तानचे प्रवक्ते असून फक्त दलाली करणे हाच राऊतांचा धंदा आहे अशी टीकाही श्री. बन यांनी केली. यावेळी श्री. बन म्हणाले की, भाजपा हिंदुत्वाचा हुंकार भरण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, योगी आदित्यनाथ आदींना बोलावतो. पंतप्रधान मोदी, योगी आदित्यनाथ यांच्यावर सामान्य भारतीय माणसाचे प्रेम आहे. आपल्याच शिवसैनिकांवर मशिदीतून दगडफेक करणाऱ्या राशीद मामू सारख्यांना उद्धव ठाकरे आपल्या पक्षात घेतात. उबाठा गट आणि राऊत यांनी मुस्लीम मतदारांच्या लांगूलचालनासाठी घेतलेली भूमिका महाराष्ट्राने ओळखली असून महाराष्ट्रातील जनता महापालिका निवडणुकीत उबाठा गटाचे पानीपत नक्की करेल असा विश्वासही श्री. बन यांनी बोलून दाखवला.

# वरवंड येथे विद्यार्थिनींसाठी सायकलींचे वाटप

## मुलींच्या शिक्षणाला 'सायकल बँक' मुळे गती



**दौंड : हॅलो प्रभात**

शाळेत जाण्यासाठी वाहतूकीचे साधन नाही, या कारणाने ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणात खंड पडू नये यासाठी दौंड तालुक्यातील वरवंड येथील एकनाथ सिताराम दिवेकर महाविद्यालयात बारामती लोकसभा मतदारसंघाच्या खासदार सुप्रिया सुळे, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संकल्पनेतून पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई व निरलॉन फाउंडेशन ट्रस्ट मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने हुशार आणि गरजू विद्यार्थ्यांना केवळ प्रवासाच्या अडचणीमुळे शिक्षणापासून वंचित राहू नये, तिला तिचे शिक्षण न थकता पूर्ण करता यावे आणि सुरक्षितपणे शाळेत पोहोचता यावे आणि सुरक्षितपणे शाळेत पोहोचता यावे, या हेतूने सायकल बँक हा उपक्रम विद्यार्थिनींसाठी राबवत आहेत, त्या निमित्ताने दौंड विधानसभा मतदारसंघातील गरजु विद्यार्थीनींना सायकलीचे वाटप करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार पक्षाचे तालुका अध्यक्ष आप्पासाहेब पवार, पुणे जिल्हा उपाध्यक्ष रामभाऊ टुले, दौंड तालुका महिला अध्यक्षा योगिनी दिवेकर, डॉ. विजय दिवेकर, तालुका सोशल मीडिया अध्यक्ष चैतन्य पाटोळे, अंकुश दिवेकर, भाऊसाहेब फडके, मंगेश फडके, विठ्ठल दिवेकर, गणेश लोणकर, शैलेश शिपलकर, अमोल नातू, सुनिल पासलकर, यांसह शिक्षक पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी एकनाथ सिताराम दिवेकर महाविद्यालयाचे प्राचार्य अनिल शिरोळे व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# कराड शहरात पोलिसांवर वाढतोय ताण

## मनुष्यबळ अपुरे, जबाबदाऱ्या प्रचंड

**कराड : हॅलो प्रभात**



कराड शहरात गेल्या काही वर्षांत झपाट्याने शहरीकरण झाले असून लोकसंख्येत मोठी वाढ झाली आहे. वाढती वाहतूक कोंडी, गुन्हेगारीचे बदलते स्वरूप तसेच सामाजिक, धार्मिक व राजकीय कार्यक्रमांची वाढती संख्या यामुळे कराड शहरातील पोलिस यंत्रणेवर प्रचंड ताण येत असल्याचे चित्र सध्या स्पष्टपणे दिसून येत आहे.

शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याची जबाबदारी पोलिसांवर असताना अपुरे मनुष्यबळ ही मोठी अडचण ठरत आहे. सण-उत्सव, मिरवणुका, मोर्चे, सभा, निवडणुका तसेच व्हीआयपी बंदोबस्तासाठी सातत्याने पोलिस बंदोबस्त लावावा लागत असल्याने अनेक पोलिस कर्मचारी सलग अनेक तास कर्तव्य बजावत आहेत. अनेक वेळा पुरेशी विश्रांती न मिळाल्याने त्याचा थेट परिणाम पोलिसांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर होत असल्याचे दिसून येत आहे.

रात्री-दिवस ड्युटी, अनिश्चित कामाचे तास आणि कुटुंबाला वेळ देता न येणे यामुळे पोलिस कर्मचाऱ्यांमध्ये मानसिक तणाव वाढत आहे. विशेषतः हवालदार, पोलीस शिपाई तसेच कनिष्ठ अधिकाऱ्यांवर कामाचा भार अधिक जाणवत आहे. वाढती वाहतूक कोंडी, गुन्हेगारीवर नियंत्रण, महिला व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा राखण्यासाठी पोलिसांना सतत सतर्क राहावे लागत आहे.

सत्ताधाऱ्यांना सत्तेमध्ये येण्यासाठी जसे बहुमत आवश्यक असते, त्याचप्रमाणे एखादे खाते किंवा यंत्रणा प्रभावीपणे चालवण्यासाठी आवश्यक मनुष्यबळही लोकसंख्येच्या प्रमाणात असणे गरजेचे असते. मात्र कराड शहराच्या वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत पोलिस मनुष्यबळ अपुरे पडत असल्याचे वास्तव समोर येत आहे.

या गंभीर परिस्थितीकडे राज्याच्या गृह खात्याचे अपेक्षित लक्ष नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने याप्रकरणी लक्ष घालून पोलिसंख्येमध्ये वाढ करणे गरजेचे आहे.व आधुनिक तांत्रिक सुविधा उपलब्ध करून देणे, तसेच पोलिस कर्मचाऱ्यांच्या आरोग्य, विश्रांती व मानसिक सुदृढतेसाठी ठोस उपाययोजना राबवण्याची मागणी नागरिक व सामाजिक घटकांकडून जोर धरत आहे. पोलिसांवरील वाढता ताण कमी करण्यासाठी प्रशासनाने तातडीने निर्णय घ्यावेत, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# आता शिक्षक भरतीची प्रक्रिया 'परीक्षा परिषदेमार्फतच'

**पुणे : हॅलो प्रभात**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद ही स्वायत्त संस्था असून या संस्थेमार्फत शिक्षक पात्रता परीक्षा, शिक्षक अभियोग्यता व बुद्धीमत्ता चाचणी यांसारख्या परीक्षांचे आयोजन केले जाते. शिक्षक पदभरतीशी संबंधित परीक्षेचे आयोजन आणि निवड प्रक्रिया एकाच संस्थेकडे असणे आवश्यक आहे. त्यामुळे शिक्षक व पदभरतीशी संबंधित सर्व कामकाज राज्य परीक्षा परिषदेकडे सोपविण्यात येत आहे, असा अध्यादेश शालेय शिक्षण विभागाने काढला आहे. परंतु, शालेय शिक्षण विभागाच्या या निर्णयामुळे शिक्षक भरतीच्या प्रतीक्षेत असणाऱ्या उमेदवारांकडून असंतोष व्यक्त होत आहे. शिक्षण आयुक्त कार्यालय हे शालेय शिक्षण विभागांतर्गत क्षेत्रीय स्तरावरील प्रमुख प्रशासकीय कार्यालय आहे. शालेय शिक्षण विभागाने निश्चित केलेल्या सर्व धोरणांची आणि घेतलेल्या सर्व निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना, देखरेख आणि नियंत्रण प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक उपाययोजना, देखरेख आणि नियंत्रण ही या कार्यालयाची प्रमुख जबाबदारी आहे. २०१७ पासून या कार्यालयांतर्गत पवित्र पोर्टलमार्फत शिक्षक भरतीची कार्यवाही करण्यात येत आहे.

# ससून रुग्णालयामध्ये ३५ वी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया!

**पुणे : हॅलो प्रभात**

शहरातील नामांकित महाविद्यालयात पदवीचे शिक्षण घेणाऱ्या व गरीब कुटुंबातील 22 वर्षाच्या तेजस (नाव बदललेले) च्या दोन वर्षांपूर्वी उच्च रक्तदाबामुळे त्याचे दोन्ही मूत्रपिंड (किडन्या) निकामी झाल्या. तेव्हापासून डायलिसिस मागे लागले. डॉक्टरांनी मूत्रपिंड प्रत्यारोपणाची पर्याय सुचवला. खासगी रुग्णालयातील 10 ते 15 लाखांचा खर्च परवडणारा नसल्याने त्यांनी ससूनमध्ये चौकशी केली. अन् ससूनमध्ये नाममात्र खर्चात त्याचे प्रत्यारोपण झाले. त्याला आईने मूत्रपिंड दान केले. तेजसचे वडील घरातील हे एकमेव कमावती व्यक्ती असून ते साफसफाई करण्याचे काम करतात व महिन्याला 13 हजार रुपये पगार मिळतो. वडिलांच्या तुटपुंजा पगारामध्ये त्यांना कुटुंबाच्या दैनंदिन गरजा पूर्ण करणेही अशक्य होते. आर्थिक परिस्थितीपुढे हतबल झालेल्या कुटुंबाला 10 लाखांचा खर्च परवडणारा नव्हता. त्यांना ससूनमध्ये मूत्रपिंड प्रत्यारोपण (किडनी ट्रान्सप्लांट) कमी खर्चात होते हे समजल्याने ते समाजसेवा अधीक्षक सत्यवान सुरवसे, अरुण बनसोडे यांना भेटले व त्यांनी पूर्ण माहिती दिली. तसेच रक्ताच्या नात्यातील व्यक्तींनी जर किडनी दान केली तर प्रत्यारोपण लवकरात लवकर करता येईल असेही समजावून सांगितले.

त्यावेळी मुलाच्या प्रेमापोटी तेजसची आई मूत्रपिंड दान करण्यास तयार झाली. अन ही शस्त्रक्रिया शनिवार (ता. 27) रोजी पार पडली. ही प्रत्यारोपण शस्त्रक्रिया ससूनचे अधिष्ठाता डॉ. एकनाथ पवार, वैद्यकीय अधीक्षक डॉ. यल्लपा जाधव, शल्यचिकित्साशास्त्र विभाग प्रमुख डॉ. लता भोईर व मानवी अवयव प्रत्यारोपण कार्यक्रम प्रमुख डॉ. किरणकुमार जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली झाली.

त्यासाठी मेडिसीन विभागाचे विभागप्रमुख डॉ. हरिदास प्रसाद, पथक प्रमुख डॉ. हर्षल भितकर, निवासी डॉक्टर, मुत्रपिंडविकारतज्ज्ञ डॉ. निरंजन आंबेकर, डॉ. संदीप मोरखंडीकर, डॉ. सुरेश पाटणकर, डॉ. राजेश श्रोत्री, डॉ. हर्षद तोष्णीवाल व डॉ. विवेक बारेकर यांनी केली.

तसेच व्हॅस्कुलर सर्जन डॉ. शार्दूल दाते, बधिरीकरणतज्ञ डॉ. सुरेखा शिंदे, डॉ. सुजित क्षिरसागर, परिसेविका राजश्री कानडे, उज्ज्वला गरुड, श्यामा बंदीसोडे, अर्चना थोरात, मुख्य अधिसेविका विमल केदारी या सर्वांचा सहभाग होता. सर्व प्रत्यारोपण शस्त्रक्रिया महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत केल्या जातात. योजने व्यतिरिक्त रुग्णांच्या शस्त्रक्रिया करिता आवश्यक असलेले परंतु उपलब्ध नसलेले औषधे, इंजेक्शन, सर्जिकल साहित्य व प्रत्यारोपण शस्त्रक्रिया नंतरच्या आवश्यक तपासण्या हा खर्च सवलतीच्या दरात उपलब्ध करून दिल्यामुळे अत्यंत कमीत कमी खर्च येतो.

ज्यांना ससून मध्ये मूत्रपिंड व यकृत प्रत्यारोपण करायचे आहे त्यांनी ससून मधील समाजसेवा अधीक्षक यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

नवे विचार...नवी सुरुवात
दैनिक
हॅलो प्रभात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली – ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून **दैनिक हॅलो प्रभात**, कार्यालय, **स.न.१४/१५/२/३, फ्लॅट नं.२०, शिवपुष्प, ए पार्क, वडगाव बु., पुणे– ४११०४१. (महाराष्ट्र)** येथून प्रसिद्ध केले.
■ **पुणे कार्यालय :** १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे–४११०३० ■ **पुणे संपर्क : ८५५१०५५११३**
■ **कोल्हापूर कार्यालय :** एस ९४६, GF-7, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर–४१६००२
■ **सांगली मुख्य कार्यालय :** कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली. ■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत)
■ मुख्य संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर ■ संपादक : संजीव शाळगावकर

हॅलो प्रभात

# MY CITY



बुधवार, दि. ३१ डिसेंबर २०२५

## एक कोटीच्या सशस्त्र दरोड्याचा थरारक छडा

**पुणे : हॅलो प्रभात :** खडकवासला-पानशेत रस्त्यावरील खानापूरमध्ये भरदिवसा सराफा पेढीवर पडलेल्या सशस्त्र दरोड्याचा छडा लावण्यात पुणे ग्रामिण पोलिसांना यश आले आहे. अवघ्या ४८ तासांत पोलिसांनी हा गुन्हा उघड केला. दरोडेखोरांनी सराफी पेढीतून 84 तोळे सोन्याचे दागिने, रोकड असा तब्बल एक कोटी पाच हजार रुपयांचा ऐवज लुटून पळ काढला होता. दरम्यान, पोलिस पाठलाग करत असल्याची चाहूल लागताच एका दरोडेखोराने नदीत उडी घेतली अन् दोघांनी दुसरीकडे पळ काढला. मात्र, प्रसंगावधान राखत धाडसी पोलिसांनी नदीत उडी घेऊन त्या दरोडेखोराला पकडले. अंकुश दगडू कचरे (वय २०), गणेश भांबु कचरे (वय २३, रा. कात्रज) अशी अटक केलेल्या दरोडेखोरांची नावे आहेत, तर त्यांच्या तीन अल्पवयीन साथीदारांना ताब्यात घेतले आहे, अशी माहिती पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल्ल यांनी पत्रकार परिषदेत दिली. पत्रकार परिषेदेत माहिती देताना पोलिस अधीक्षक संदीपसिंग गिल्ल, पोलिस अधिकारी कर्मचारी. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या आठवड्यात (दि. २६ डिसेंबर) खानापूरमधील वैष्णवी ज्वेलर्सवर दरोडेखोरांनी कोयते, तलवार हातात घेऊन भरदुपारी दरोडा टाकला होता. याप्रकरणी हवेली पोलिसांत गुन्हा नोंद केला होता. पोलिस अधीक्षक संदीपसिंग गिल्ल यांनी आरोपींना पकडण्याच्या सूचना केल्या होत्या. त्यानुसार, स्थानिक गुन्हे शाखा व हवेली पोलिसांची एकूण ६ पथके तयार केली होती.

## थोडक्यात पण महत्वाचे



### पुणे वृत्तपत्र विक्रेता संघाचा ४१ वा वर्धापनदिन उत्साहात साजरा

**पुणे : हॅलो प्रभात**

पुणे वृत्तपत्र विक्रेता संघाचा ४१ वा वर्धापनदिन संघटनेच्या नारायणपेठ येथील कार्यालयात सत्यनारायण पूजा व विविध उपक्रम राबवून उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त पहाटे पुणे व पिंपरी चिंचवड भागातील अंक विक्री केंद्रावर केक कापून तसेच फटाके वाजवून साजरा करण्यात आला. यानिमित पुणे वृत्तपत्र विक्रेता संघाच्या नारायणपेठ येथील कार्यालयात स्नेह मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलताना पारगे यांनी सर्वांना शुभेच्छा देत यापुढील काळात देखील संघटनेचे कार्य असेच विक्रेत्यांच्या हिताचे निर्णय घेऊन विक्रेत्यांच्या उत्पन्नात भरघोस वाढ करण्याबाबत सर्व पदाधिकारी प्रयत्नशील राहतील व भविष्यात अंक वाढीसाठी सर्व विक्रेते देखील सर्व व्यवस्थापनांना संपूर्ण सहकार्य करतील असा विश्वास व्यक्त केला. याप्रसंगी विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी उपस्थित राहून वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या. शुभेच्छांचा स्वीकार पुणे वृत्तपत्र विक्रेता संघाचे अध्यक्ष विजय पारगे यांनी केला. यावेळी संघटनेचे कार्याध्यक्ष अनंता भिकुले, सचिव अरुण निवंगुणे, खजिनदार संदीप शिंदे यांच्यासह विश्वस्त, विभागप्रमुख, पदाधिकारी, वृत्तपत्र विक्रेते उपस्थित होते.

### पहाटे दरोडा टाकणाऱ्या टोळीला बेड्या; पोलिसांची धडक कारवाई

**पुणे : हॅलो प्रभात**

पहाटेच्या वेळी दरोडा टाकून लुटणाऱ्या टोळीतील तिघांना स्थानिक गुन्हे शाखा आणि इंदापूर पोलिसांनी अटक केली. आबा आप्पा शिंदे (वय 35), सुनील भीमा पवार, अजय उन्नेश्वर गवळी (रा. तिघे मोहा, ता. कळंब, जि. धाराशीव) अशी अटक केलेल्या दरोडेखोरांची नावे असून, त्यांच्यावर विविध जिल्ह्यात मालमत्ता चोरीचे गुन्हे दाखल आहेत. न्यायालयाने 1 जानेवारीपर्यंत आरोपींना पोलिस कोठडी सुनावली आहे. 15 डिसेंबर रोजी इंदापूर तालुक्यातील विठ्ठलवाडी गावात सिंधू भोंग यांच्या घरी पहाटे साडेचार वाजता आरोपींनी दरोडा टाकला होता. सिंधू, त्यांचे पती पांडुरंग आणि बहीण मुक्ताबाई ननवरे यांना मारहाण करून सोन्याचे दागिने हिसकावले होते. तसेच बागल फाटा, बावडा येथे एका महिलेचे मंगळसूत्र जबरदस्तीने चोरले होते. दोन्ही घटनांत आरोपींनी सोन्याचे दागिने, रोकड आणि टीव्ही असा 91 हजार रुपयांचा ऐवज लुटून पळ काढला होता. याप्रकरणी, सिंधू भोंग यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, इंदापूर पोलिस ठाण्यात अज्ञात दरोडेखोरांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला होता. दरोडेखोर चारचाकी मोटारीतून आले होते. एवढी माहिती पोलिसांच्या हाती होती. स्थानिक गुन्हे शाखा आणि इंदापूर पोलिस तपास करत असताना सीसीटीव्हीत पांढऱ्या रंगाच्या दोन स्कॉर्पिओ गाड्या दिसून आल्या. पोलिसांना हा गुन्हा कळंब तालुक्यातील मोहा गावात राहणाऱ्या आबा शिंदे आणि त्याच्या साथीदारांनी केल्याची माहिती मिळाली.

### पुण्याची जागतिक ओळख घडवणारी सायकल स्पर्धा

**पुणे : हॅलो प्रभात**

'बजाज पुणे ग्रँड टूर २०२६' सायकल स्पर्धेच्या माध्यमातून पुण्याची पर्यटन आणि क्रीडा क्षेत्रात जागतिक हब म्हणून ओळख निर्माण करण्याकरिता प्रशासन प्रयत्नशील असून, त्यादृष्टीने तयारी करीत आहे. जिल्ह्यातील विद्यापीठे, महाविद्यालये, राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना, नेहरू युवा केंद्र, क्रीडा संघ, ग्रामंपचायतीने सक्रिय सहभाग घेत स्पर्धा यशस्वी करण्याकरिता एकत्रितपणे प्रयत्न करूया, असे आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयातील बहुउद्देशीय सभागृहात आयोजित बैठकीत जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी बोलत होते. यावेळी जिल्हा नियोजन अधिकारी, विद्यापीठे, महाविद्यालये, राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना, नेहरू युवा केंद्र, क्रीडा संघाचे सदस्य तसेच संबंधित ग्रामंपचायतीचे सरपंच, ग्रामसेवक उपस्थित होते. डुडी म्हणाले, पुणे शहराला असलेला सायकलीचा इतिहास, येथील भौगोलिक परिस्थिती, जैवविविधता, ऑलिम्पिक स्पर्धेकरिता सायकलपटूंना प्रोत्साहित करणे या सर्व बाबींचा संगम साधून 'टूर द फ्रांस' या स्पर्धेच्या धर्तीवर जिल्ह्यात 'बजाज पुणे ग्रँड टूर २०२६' स्पर्धेचे १९ ते २३ जानेवारी २०२६ या कालावधीत आयोजन करण्यात येत आहे. यूसीआय सायकलिंग कॅलेंडरमध्ये अधिकृतपणे समावेश करण्यात आला असून, स्पर्धेचे थेट प्रक्षेपण जगभरात होणार आहे. संपूर्ण स्पर्धा ही चार टप्प्यांत होणार असून, जिल्ह्यातील एकूण 9 तालुक्यांतून समावेश करण्यात आला आहे.

### सेनेला अजूनही युतीची आशा! भाजपसोबत महायुती तुटलेली नाही

**पुणे : हॅलो प्रभात**

पक्षाचे पदाधिकारी भावनेच्या भरात भाजपसोबत युती तुटली, असे म्हणाले असतील. परंतु, मुंबई-पुण्यासह सर्वच महापालिकांमध्ये महायुतीचा भगवा फडकविण्यासाठी आम्ही एकदिलाने कार्यरत आहोत. कुठेही महायुती तुटलेली नसून मी अधिकृतपणे याची घोषणा करत आहे' असे शिवसेनेचे नेते उदय सामंत यांनी मंगळवारी पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले. तसेच आतापर्यंत पुण्यात किती एबी फॉर्म भरले, याबाबत निश्चित माहिती उपलब्ध नसून तीन तारखेला चित्र स्पष्ट होईल, असेही ते म्हणाले. मंगळवारी सकाळी शिवसेनेचे शहराध्यक्ष नाना भानगिरे यांनी युती तुटल्याचा उच्चार करत सर्व जागा लढवणार असल्याचे सांगितले. शिवसेनेचे महानगर प्रमुख रवींद्र धंगेकर यांनीही महायुती तुटल्याने स्वबळावर लढण्याचे संकेत दिले. त्यानंतर विजय शिवतारे यांनी महायुती शाबूत असल्याचे सांगितले. शिवसेनेतील पदाधिकाऱ्यांच्या परस्परविरोधी वक्तव्याने भाजप शिवसेना युतीबाबत संभ्रम निर्माण झाला असताना सामंत यांनी युती शाबूत असल्याचा पुनरुच्चार केला. याबाबत शिवसेना पदाधिकाऱ्यांची हॉटेल रॅमी ग्रँड येथे बैठक सुरू होती. यावेळी बैठकीला सामंत आले असताना त्यांनी ही माहिती दिली.

# खराडी-वाघोली प्रभागात बाहुबली कोण?

## विद्यमान आमदारांना सुपुत्राचेच आव्हान : विद्यमानांना गड राखण्याचे आव्हान

**पुणे : हॅलो प्रभात**

सोमनाथ साळुंके



राष्ट्रवादी काँग्रेस(शप) गटाचा व विद्यमान आमदारांचा बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या खराडी-वाघोली प्रभागातून विद्यमानांच्या सुपुत्रानेच भाजप पक्षाकडून उमेदवारी मिळून पालिका निवडणुकीच्या रिंगणात उडी घेऊन उमेदवारी मिळविल्याने विद्यमान आमदारांना त्यांच्या सुपुत्राचेच आव्हान उभे राहिल्याने प्रभागातून बाहुबलीची भूमिका कोण? बजावणार हे निर्णायक ठरणार आहे.

पुढील महिन्यात पालिका निवडणुकीचे बिगुल वाजले असले तरी पण दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेससह भाजपचा देखील बालेकिल्ला म्हणून वडगाव शेरी विधानसभा मतदार संघाकडे पाहिले जात असतानाच मतदार संघात सहा ही प्रभागात उमेदवारांमध्ये काटे की, टक्कर लढत होण्याची शक्यता नाकारता येत नसली तरी पण २०१४ व २०१९मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस(शप)गटाच्या बालेकिल्ल्याला खिंडार पडून मतदार संघात भाजप व अजित पवार गटाचे वर्चस्व राहिले असले तरी पण शरदचंद्र पवार गटाचे विद्यमान आमदार बापूसाहेब पठारे यांनी हा गड काबीज करण्यात यश मिळविले असले तरी पण २००९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत पठारे यांनी मतदार संघावर प्रथम झेंडा फडकविण्यास यश मिळून २०१२ झालेल्या पालिका निवडणुकीत पठारे यांनी एकहाती सत्ता मिळवली होती. तर २०१४ मध्ये मतदार संघावर भाजपचे जगदीश मुळीक यांच्या वतीने पक्षाला यश मिळाल्याने २०१७ मध्ये मतदार संघावर पालिका निवडणुकीत भाजपचे वर्चस्व राहिले होते. त्यानंतर २०२४मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत पठारे यांनी पुन्हा वर्चस्व मिळविले आहे.

सध्या पालिका निवडणुकीत सर्व राजकीय नेत्यांचे लक्ष वेधून राहिलेल्या या मतदारसंघात आमदार बापूसाहेब पठारे यांच्या मार्गदर्शनाखाली खराडी प्रभागात २००९पासून पालिका निवडणुकीत भाजप पक्षाच्या लाटेत आपल्या ताब्यात ठेवण्यात यश मिळविले आहे.मात्र भाजप पक्षाने हा गड काबीज करण्यासाठी नवी राजकीय खेळी करून प्रभागाला विरोधी पक्षाला खिंडार पाडण्यासाठी चक्क आमदार यांचे सुपुत्र सुरेंद्र पठारे यांना पक्षाच्या ताफ्यात सामावून घेतल्यामुळे पुढील महिन्यात होणाऱ्या पालिका निवडणुकीत प्रभागात वेगळेच चित्र पाहायला मिळणार असल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. भाजपच्या वतीने सुरेंद्र पठारे यांच्या पत्नी ऐश्वर्या पठारे यांना विमाननगर प्रभाग क्रमांक तीनमधून उमेदवारी जाहीर करून निवडणुकीच्या रिंगणात उतरविले असतानाच खराडी-वाघोली प्रभाग क्रमांक चारमधून खुद्द आमदार सुरेंद्र पठारे यांच्या पारड्यात उमेदवारीचे तिकीट देऊन त्यांच्या बरोबर शैलेश बनसोडे, संतोष भरणे व अनिल सातव यांच्या पत्नीस उमेदवारी जाहीर केल्याने पठारे यांचा पॅनल मजबूत झाला असला तरी पण विद्यमानांच्या आमदार सुपुत्राने त्यांची साथ सोडत भाजप पक्षात प्रवेश करून एक नव्हे चक्क दोघा पती-पत्नींना उमेदवारी मिळविण्यास यश मिळविले आहे.

पण विद्यमान आमदार बापूसाहेब पठारे यांना देखील कमी लेखून चालणार नाही.२०२४मध्ये त्यांनी देखील भाजपला रामराम करत राष्ट्रवादी काँग्रेस(शप)पक्षात प्रवेश मिळून मतदार संघावर पुन्हा पक्षाचा झेंडा फडकविण्यास यश मिळविले असले तरी पण त्यांच्या सुपुत्राने भाजप पक्षात प्रवेश केल्यामुळे ते आता सुपुत्राच्या पाठीशी उभे राहणार की, पक्षातील इतर उमेदवारांच्या पाठीशी राहणार हा चर्चेचा विषय बनला असल्याने याकडे मतदार संघातील राजकीय नेत्यांसह कार्यकर्त्यांचे लक्ष वेधून राहिले आहे. तर प्रथमच पालिकेच्या निवडणुकीत उतरलेले त्यांचे सुपुत्र सुरेंद्र पठारे हे त्यांच्या रूपाने प्रभागात प्रथमच पक्षाचा झेंडा फडकविण्यास यश मिळवणार का? हे निर्णायक ठरणार असले तरी पण नव्यानेच वाघोलीच्या काही भागांचा समावेश करण्यात आल्याने भाजप राष्ट्रवादी पक्षाची युती तुटल्याने या भागातून असलेली मते ही विभागली जाणार असल्याने मतदार हे कोणाच्या पारड्यात मतदानाचा हक्क बजावणार हे देखील निर्णायक ठरणार आहे.त्यातच प्रभागात राष्ट्रवादी काँग्रेस (शप) गटातून कोणत्या उमेदवाराच्या गळ्यात उमेदवारीची माळ घालण्यासाठी कुलुपाची चावी विद्यमान आमदारांच्या हातात असल्यामुळे ते पक्षाकडून ताकदवर उमेदवार उभा करणार की, कमकुवत उमेदवारास उमेदवारी देणार याकडे सर्वांच्या नजरा लागल्या असल्याने आमदार हे सुपुत्र व भाचे असलेले संतोष भरणे यांना साथ देणार का? याची चर्चा प्रभागात असले तरी आमदारांचे सुपुत्र व भाचे संतोष भरणे भूमिकेमुळे बापूसाहेब पठारे यांच्यासमोर हा गड शाबूत ठेवण्याचे कडवे आव्हान असणार आहे.पण गेल्या तीस ते पस्तीस वर्षापासून सामाजिक क्षेत्राबरोबरच राजकारणाचा गाडा अभ्यास असलेले बापूसाहेब पठारे यांना देखील कमी लेखून चालणार नाही.कारण पक्षश्रेष्ठींकडून आलेल्या आदेशानुसारच त्यांना पक्षाची सर्व सूत्रे हाती घेण्याची वेळ येणार असून त्यांना देखील गेल्या तीस ते पस्तीस वर्षापासून राजकारणाचा असलेला अनुभव त्यांच्या पाठीशी असल्याने त्यांनी देखील गेल्या तेरा वर्षापासून प्रभागात असलेले पक्षाचे वर्चस्व कायम ठेवण्यासाठी कंबर कसली असली तरी पण आगामी पालिका निवडणुकीत प्रभागात बाहुबलीची भूमिका बजावण्यासाठी दोन्ही पिता-पुत्रासमोर कडवे आव्हान उभे राहून विद्यमान आमदारांना सुपुत्राचे आव्हान पेला वनार का? हे देखील तेवढेच निर्णायक ठरणार असल्याने प्रभागात पिता-पुत्रांपैकी कोण? बाहुबलीची भूमिका बजावणार? याबाबत मतदार संघातील खराडी-वाघोली प्रभागात होणारी निवडणुकीमध्ये काटे की, टक्कर लढत होणार असल्याच्या चर्चेला प्रभागात उधाण आले आहे.

## पुन्हा वेश्याव्यवसाय; तरुणींची सुटका, स्पा व्यवस्थापकासह दोघे अटकेत

**पुणे : हॅलो प्रभात**

कल्याणीनगर परिसरात स्पा सेंटरच्या नावाखाली सुरू असलेल्या वेश्या व्यवसायाचा येरवडा पोलिसांनी पर्दाफाश करत तरुणींची सुटका केली. याप्रकरणी स्पा सेंटर व्यवस्थापकासह दोघांना अटक केली. मोतीबर समसुलहक रेहमान (वय ३१, रा. संजय पार्क, विमाननगर,मूळ रा. आसाम), अब्दुल मोनुउद्दीन आवाल (वय १९, रा. लक्ष्मीनगर, येरवडा) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याबाबत पोलिस शिपाई बालाजी सोगे यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार आरोपींच्या विरुद्ध अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कल्याणीनगर भागातील गेरा एस 77 इमारतीत स्पा सेंटरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय सुरू असल्याची माहिती येरवडा पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने तेथे छापा टाकला. या कारवाईत पोलिसांनी स्पा सेंटरमधून तरुणींना ताब्यात घेण्यात आले. वरिष्ठ पोलिस निरीक्षक अंजुम बागवान, पल्लवी मेहेर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. कात्रज-मंतरवाडी बाह्यवळण मार्ग, तसेच बाणेर भागातील एका लॉजमध्ये सुरू असलेल्या वेश्याव्यवसायाचा प्रकार पोलिसांनी नुकताच उघडकीस आणला.



त्यानंतर कोंढव्यातील एका स्पा सेंटरवर छापा टाकून पोलिसांनी तरुणींची सुटका केली. याप्रकरणी स्पा सेंटरच्या चालकासह दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. स्पा सेंटरच्या नावाखाली सुरू असलेले गैरप्रकाराच्या तक्रारी पोलिस आयुक्तांकडे करण्यात आल्या. त्यानंतर पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी स्पा सेंटरच्या नावाखाली सुरू असलेल्या गैरप्रकारांवर कारवाईचे आदेश शहरातील सर्व पोलिस ठाण्यांच्या प्रमुखांना दिले आहेत.



## चंद्रकांत पाटलांना नडलेला मोहरा राष्ट्रवादीत

**पुणे : हॅलो प्रभात**

### बालवडकर यांचा प्रवेश राष्ट्रवादीसाठी मोठा फायदा

**बालवडकर हे बाणेर-बालेवाडी, पाषाण, सूस या भागात भाजपचे मजबूत चेहरा मानले जात होते. त्यांच्या बाहेर पडण्यामुळे प्रभाग ९ मध्ये भाजपची आधीची ताकद जवळपास अर्धी होऊ शकते. विशेषतः पाषाण भागात राष्ट्रवादीचा प्रभाव असल्याने बालवडकर यांचा प्रवेश अजित पवार गटासाठी मोठा फायदा ठरू शकतो. चंद्रकांत पाटील यांच्या आक्रमक राजकारणामुळे हा प्रकार घडल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.**

पुणे महानगरपालिका निवडणुक उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी भाजपमध्ये मोठी उलथापालथ झाली आहे. भाजपचे माजी नगरसेवक आणि बाणेर-बालेवाडी प्रभागातील प्रभावशाली नेते अमोल बालवडकर यांनी पक्षाची साथ सोडून अजित पवार गटाच्या राष्ट्रवादीमध्ये प्रवेश केला आहे. उमेदवारी नाकारल्याने नाराज झालेल्या बालवडकर यांनी राष्ट्रवादीचे घड्याळ आपल्या मनगटावर बांधले असून, प्रभाग क्रमांक ९ मधून राष्ट्रवादीच्या तिकीटावर निवडणूक लढवणार आहेत. अमोल बालवडकर हे २०१७ ते २०२२ या काळात बाणेर-बालेवाडी प्रभागातून भाजपचे नगरसेवक होते. त्यांनी कोथरूड विधानसभा मतदारसंघातूनही उमेदवारीची इच्छा व्यक्त केली होती, परंतु पक्षाने चंद्रकांत पाटील यांनाच पुन्हा उमेदवारी दिली. विधानसभा निवडणुकीत बालवडकर यांनी चंद्रकांत पाटील यांच्या विरोधात छुपे युद्ध उघडले होते. देवेंद्र फडणवीस यांनी बालवडकर यांना माघार घेण्यासाठी शब्द दिला होता आणि पुढील काळात न्याय देऊ असे आश्वासन दिले होते. मात्र, महापालिका निवडणुकीत ऐनवेळी त्यांना तिकीट नाकारल्याने बालवडकर यांनी “दगा फटका” असा गंभीर आरोप करत पक्ष सोडला. बालवडकर म्हणाले, विधानसभेत एक लाखाच्या मताधिक्याने चंद्रकांत पाटील यांना निवडून आणले, तरीही पक्षाने माझ्याशी विश्वासघात केला. दोन दिवस अगोदर सांगितले असते तर मी ऐकले असते, पण शेवटच्या क्षणांपर्यंत झुलवले. हे नुकसान माझे नाही, पक्षाचे होणार आहे. अजितदादांनी मोठ्या मनाने उमेदवारी दिली, यात माझे काहीही नुकसान नाही.

# कल्लोळ, टाहो, आक्रोश अन् धिंगाणा!

## निष्ठावंतांचे तिकीट कापल्याने कार्यकर्त्यांचा दंगा

**पुणे : हॅलो प्रभात**



**पुण्यात ही शिंदे यांची शिवसेना तसेच भाजप, राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये नेतृत्वाच्या पातळीवर जागांसाठी तर वार्डात नगरसेक पदासाठी इच्छुकांची गर्दी जमली होती . त्याच वेळी घोषणा, रडारड , आरडाओरडा पहायला मिळाला. राज्यातील बहुतेक महापालिकेत विविध पक्ष कसे आपल्या आर्यकर्त्यांना बाजूला ठेवत विरोधी पक्षातले येते आपल्या पक्षात आले तर काय होते याचे वास्तवदर्शी उदाहरण पहायला मिळाले.**

एबी फॉर्म दाखल होण्यास काही तास शिल्लक राहिले असताना सत्तारूढ तसेच शिवसेना उबाठा पक्षात कार्यकर्ते , नेते आणि निवडणुकीस अनेक वर्षे काम करत असलेले निष्ठावंत यांच्यात असंतोष पसरला. महायुती तुटल्यानंतर आपल्याला सहज उमेदवारी मिळेल, असे निष्ठावंतांना वाटत होते. पण त्याचवेळी तिकीट कापल्याचे समोर आल्यानंतर छत्रपती संभाजीनगरमध्ये मंत्री अतुल सावे यांच्या कार्यालयाबाहेर मोठा हायहोल्टेज ड्रामा रंगला. अशीच परिस्थिती पुणे, नाशिक, मुंबई कल्याण - डोंम्बवली व इतर महापालिका लढवण्यास इच्छुकांमध्ये दिवसभर पहायला मिळाली. गेल्या कित्येक वर्षांपासून छत्रपती संभाजीनगरमध्ये पक्षाशी एकनिष्ठ राहिल्यावर सुद्धा उमेदवारी न मिळाल्याने महिला उमेदवारांनी मोठा गोंधळ केला. तर काही पुरुष उमेदवारांनी बाहेर टाकलेल्या पेंडॉलमध्येच ठिय्या दिला. यावेळी महिलांना भोवळ आली. वॉर्ड क्रमांक २२ मध्ये इच्छुकांना उमेदवारी नाकारल्याने उमेदवाराला अश्रू अनावर झाले. तर त्याच्या पत्नीला भावना आवरता आल्या नाही. तर दुसरीकडे इतर वॉर्डातील महिला उमेदवाराने सुद्धा मोठा राडा घातला. लता दलाल या भाजपच्या अत्यंत जुन्या कार्यकर्त्या आहेत. त्यांना सुद्धा तिकीट नाकारण्यात आल्याचे समोर येत आहे. त्यामुळे यावेळी अनेक जणांनी पक्षाविरोधात घोषणाबाजी केली. एकनिष्ठ असूनही एबी फॉर्म नाकारल्याने या उमेदवारांनी टाहो फोडला. त्यातील अनेकांनी भाजप रसातळाला चालल्याचा आरोप केला.

दरम्यान शिंदे गटातच प्रचंड खदखद पहायला मिळाली. बड्या नेत्याच्या झटपट राजीनाम्याने खळबळ, कल्याण-डोंबिवलीत राजकीय घडामोडींना प्रचंड वेग

यातील महिला उमेदवाराने पैसे घेऊन तिकीट वाटप झाल्याचा आरोप केला. गेल्या १५ वर्षांपासून भाजपसाठी राबराब राबलो. पण आता तिकीट वाटपाच्या वेळी पक्षात नवीन आलेल्यांना उमेदवारी देण्यात आली. पैसे घेऊन हे तिकीट वाटप झाल्याचा आरोप यावेळी तिकीट कापलेल्या भाजप पदाधिकाऱ्यांनी पक्षावर केला. त्यामुळे एकच गोंधळ उडाला. मंत्री अतुल सावे यांची भेट घ्यायची असल्याचा आग्रह या कार्यकर्त्यांनी धरल्याने पोलिसांनी त्यांना थांबवले. त्यावरुन मग संताप उडाला. उमेदवारांचा पारा पडला. त्यांनी भाजपविरोधात घोषणाबाजी सुरू केली. त्याचवेळी नेत्यांवर गंभीर आरोप केले. पक्ष निष्ठावंतांना डावलल्याने त्रागा केला. या उमेदवारांना थोपवण्यासाठी पोलिसांना मोठी कसरत करावी लागली. यावेळी शिवाजीनगर परिसरातून उमेदवारीसाठी आलेल्या महिलेला भोवळ आली. तिला अश्रू अनावर झाले. आपण पक्षाच्या कार्यक्रमात झोकून देऊन काम केले. रक्त आटवून आम्ही पक्षासाठी झटलो. कालपर्यंत आम्हाला उमेदवारी देणार असे सांगत होते. पण वेळेवर तिकीट कापले. आम्ही पक्षासाठी कोर्ट केसेस अंगावर घेतल्या. अनेक गुन्हे अंगावर घेतले आणि आता आम्हाला डावलून पैसे देणाऱ्यांना तिकीट वाटप करण्यात आल्याचा आरोप इच्छुकांनी नेत्यांवर केला.

दरम्यान अनेक जुन्या कार्यकर्त्यांना सुद्धा उमेदवारी नाकारल्याने छत्रपती संभाजीनगरमध्ये बंडखोरी उफळण्याची शक्यता आहे. अनेकांनी पक्षाने उमेदवारी नाकारल्यानंतर अपक्ष लढणार असल्याचे जाहीर केले. तर एका महिला उमेदवाराने आता भाजप उमेदवाराला पाडणार असल्याचे जाहीर केले. त्यामुळे छत्रपती संभाजीनगरमधील अनेक वॉर्डात शिवसेना आणि इतर विरोधकांपेक्षा या बंडखोरांचाच मोठा ताप पक्षाला झाल्याचे दिसून येत आहे. या बंडोबांना शांत करण्याचे मोठे आवाहन पक्षासमोर आहे.



## थोडक्यात पण महत्वाचे



### आबासाहेब काकडे विद्यालयात क्रीडा स्पर्धेचे आयोजन

**शेवगाव-अजय नजन : हॅलो प्रभात**

आबासाहेब काकडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय शेवगावमध्ये वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त आज दि . ३० डिसेंबर रोजी क्रीडा स्पर्धा, केशरचना व मेकअप स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते .यावेळी विद्यालयाचे प्राचार्य संपतराव दसपुते ,प्रभारी उपप्राचार्य अशोक तमनर, पर्यवेक्षक सुनील आव्हाड,लक्ष्मण गाडे ,रवींद्र आगळे,केशरचना व मेकअप स्पर्धेच्या उद्घाटक जयश्री फलके संगीता दानवे तसेच पोलीस कॉन्स्टेबल आदिनाथ शिरसाठ व राहुल आठरे ,साहिल गांधी, चैतन्य देहाडराय ,रामेश्वर पालवे सर, शिवाजी पाटेकर,प्रा .मंजूश्री बुधवंत आदी मान्यवर उपस्थित होते .यावेळी केशरचना व मेकअप स्पर्धेच्या उद् घाटिका यांनी स्पर्धेमध्ये सहभाग घेतलेल्या उच्च माध्यमिक विद्यालयाच्या सर्व विद्यार्थिनींच्या केशरचना व मेकअपची पाहणी करून त्यांचे कौतुक केले व प्रथम तीन क्रमांक घोषित केले . क्रीडा स्पर्धांच्या आयोजनामध्ये १०० मीटर धावणे ,फुगा फुगवणे व फोडणे ,संगीत खुर्ची,स्लो सायकलिंग, पोत्यात उडी मारणे अशा मनोरंजक खेळांचे आयोजन करण्यात आले होते .या स्पर्धेला विद्यार्थ्यांनी भरभरून प्रतिसाद दिला . सहभागी विद्यार्थ्यांमधून प्रत्येक स्तरांमधून प्रत्येकी तीन क्रमांक काढण्यात आले .सदर सर्व विजेत्या विद्यार्थ्यांना स्नेहसंमेलनाच्या शेवटच्या दिवशी वार्षिक पारितोषिक वितरण समारंभामध्ये मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात येणार आहे. क्रीडा स्पर्धा यशस्वी होण्यासाठी क्रीडा शिक्षक कल्पेश भागवत,विक्रम घुटे गणेश ढोले, रवींद्र मडके, सचिन वाल्हेकर यांचे व सर्व शिक्षक बंधू-भगिनींचे मोलाचे सहकार्य लाभले .

### नायलॉन मांजामुळे जीवितास धोका

**कोपरगाव : हॅलो प्रभात**



■ नगराध्यक्ष पराग संधान; प्रशासन व नागरिकांनी विशेष काळजी घ्यावी

संक्रांती सण आनंद, उत्साह आणि सामाजिक सलोख्याचे प्रतीक असला तरी नायलॉन मांजामुळे या सणाला गालबोट लागण्याची भीती व्यक्त होत आहे. नायलॉन मांजा हा केवळ बेकायदेशीरच नाही तर तो मानवी जीवन, पशुपक्षी आणि पर्यावरणासाठी अत्यंत घातक असल्याचे प्रतिपादन कोपरगाव नगरपरिषदेचे नगराध्यक्ष पराग संधान यांनी केले आहे. नगराध्यक्ष संधान म्हणाले की, नायलॉन मांजामुळे दरवर्षी अनेक दुर्दैवी अपघात घडतात. दुचाकीस्वार, पादचारी, लहान मुले तसेच पक्ष्यांचे गळे कापले जाण्याच्या घटना घडतात. काही वेळा या अपघातांत निष्पाप नागरिकांना आपला जीवही गमवावा लागतो, ही बाब अत्यंत गंभीर आहे. त्यामुळे अशा जीवघेण्या मांजाची विक्री, साठवणूक आणि वापर होणार नाही यासाठी प्रशासनाने कठोर भूमिका घ्यावी. संक्रांती सणाच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासन आणि संबंधित यंत्रणांनी संयुक्तपणे कारवाई करून नायलॉन मांजाची विक्री होणार नाही यासाठी काळजी घ्यावी अशी मागणी नगराध्यक्ष पराग संधान यांनी केली. तसेच त्यांनी नागरिकांनाही आवाहन केले की, सण साजरा करताना आनंदाबरोबरच सामाजिक जबाबदारीचे भान ठेवावे. आपल्या हातातील जीवघेण्या दोऱ्यामुळे कुणाचा जीव धोक्यात येऊ नये, याची प्रत्येकाने काळजी घ्यावी. पर्यावरणपूरक दोरा वापरणे हाच सुरक्षित आणि कायदेशीर पर्याय आहे.संक्रांती हा सण आनंदाचा आहे, दु:खाचा नाही. त्यामुळे नायलॉन मांजासारख्या धोकादायक प्रकारांना थारा न देता सुरक्षित, पर्यावरणस्नेही पद्धतीने सण साजरा करूया, असे आवाहन नगराध्यक्ष पराग संधान यांनी शेवटी केले.

### रिलायन्सचा एआय जाहीरनामा

**नवी दिल्ली : हॅलो प्रभात**

रिलायन्स इंडस्ट्रीजचे अध्यक्ष मुकेश अंबानी यांनी रिलायन्स समूहासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित जाहीरनामा जाहीर केला आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून ही कंपनी आपल्या सहा लाख कामगारांची उत्पादकता दहा पटीने वाढविणार आहे. याचा भारतीय अर्थव्यवस्थेवर तितकाच सकारात्मक परिणाम होणार आहे.

## शब्दगंधच्या उपक्रमामुळे नवोदितांना चालना : शब्बीर शेख

**राहुरी : हॅलो प्रभात**



शब्दगंध च्या सातत्यपूर्ण उपक्रमामुळे नवोदित साहित्यिकांना चालना मिळत असून सक्षम साहित्यपिढी घडवण्यासाठीचे प्रयत्न यशस्वी होत आहेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक, संकलक शब्बीर शेख यांनी केले.

शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या वतीने कोहिनूर मंगल कार्यालयात अध्यक्ष राजेंद्र उदागे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी शब्दगंध चे संस्थापक, सचिव सुनील गोसावी, कवी सुभाष सोनवणे, प्रा.डॉ.अनिल गर्जे, प्रा. डॉ. तुकाराम गोंदकर, सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. जी.पी.ढाकणे, प्रा.डॉ. अशोक कानडे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.मान्यवरांच्या हस्ते शब्दगंध दिनदर्शिका प्रकाशित करण्यात आली. पुढे बोलताना शब्बीर शेख म्हणाले की, सातत्यपूर्ण उपक्रमामुळे शब्दगंध हे नाव साहित्य क्षेत्रात अग्रगण्य मानले जाते, नाविन्यपूर्ण उपक्रम सातत्याने राबवत असल्याने लेखक,कवींना प्रेरणा आणि प्रोत्साहन मिळत असून ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे.

यावेळी राजेंद्र उदागे यांच्या मातोश्री श्रीमती शशिकला भाऊसाहेब उदागे,कोल्हापूर येथील जेष्ठ लेखक डॉ. सुनीलकुमार सरनाईक, ज्येष्ठ लेखक,संकलक अरुण आहेर, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ.बाबा आढाव यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. पुढील उपक्रमाबद्दल चर्चा करून निर्णय घेण्यात आले. सुभाष सोनवणे यांची निमगाव वाघा येथे होणाऱ्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल तर स्वाती अहिरे यांना नजुबाई गावित पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी बबनराव गिरी, प्रसाद भडके, मकरंद घोडके, रूपचंद शिदोरे, कार्तिक झेंडे,जयश्री राऊत, शर्मिला गोसावी, सरला सातपुते यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. प्रा.डॉ.अनिल गर्जे यांनी बैठकीचे सूत्रसंचालन केले तर बबनराव गिरी यांनी स्वागत करून प्रास्ताविक केले. शेवटी राज्य संघटक प्रा.डॉ.अशोक कानडे यांनी आभार मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दिशा गोसावी, ऋषिकेश राऊत, भाग्यश्री राऊत, हर्षली गिरी यांनी परिश्रम घेतले.

## नववर्षाच्या पहिल्या दिवशी भजन संध्याचे आयोजन

**कोपरगाव : हॅलो प्रभात**

कोपरगाव शहर व तालुक्यातील सर्व नागरिकांना नवीन वर्ष २०२६ च्या हार्दिक शुभेच्छा देत, नवीन वर्षाची नवी सुरुवात सन्मान, सेवा आणि भक्तीच्या भावनेतून व्हावी, या उद्देशाने साई समर्थ प्रतिष्ठान, कोपरगाव यांच्या वतीने गुरुवार, दिनांक १ जानेवारी २०२६ रोजी नवनिर्वाचित नगराध्यक्ष पराग संधान आणि नगरसेवक उमेदवार यांचा नागरी सत्कार व भजन संध्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम युवानेते विवेकभैय्या कोल्हे आणि सौ.रेणुकाताई कोल्हे यांच्या उपस्थितीत निवारा येथील सप्तश्रृंगी माता मंदिर परिसर, डेली फ्रेश रोड येथे सायंकाळी ६.०० वाजता सुरू होणार आहे. कार्यक्रमाची सुरुवात नागरी सत्कार समारंभाने होणार असून, त्यानंतर भक्तिमय वातावरणात राहुल खरे गौरव महाराष्ट्राचा विजेता यांची भजन संध्या आयोजित करण्यात आली आहे.

लोकशाही प्रक्रियेतून जनतेचा विश्वास संपादन केलेले लोकप्रतिनिधी तसेच लोकसेवेच्या भावनेतून निवडणूक प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेतलेले मान्यवर यांचा यावेळी सन्मान करण्यात येणार आहे. नववर्षाच्या पहिल्याच दिवशी समाजात सकारात्मक ऊर्जा, एकता आणि सलोखा वाढावा, हा या कार्यक्रमामागील प्रमुख हेतू आहे. हा कार्यक्रम साई समर्थ प्रतिष्ठानचे संस्थापक कलविंदर सिंग दडीयाल, पराग संधान मित्रपरिवार, तसेच प्रभाग क्रमांक तीनमधील सर्व नागरिक यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये निवारा, कोजागिरी, जानकी विश्व, रिद्धी-सिद्धी, सुभद्रा नगर, येवला रोड, आढाव वस्ती,विद्यानगर,रचना पार्क परिसरातील नागरिकांचा सक्रिय सहभाग लाभणार आहे.

## थर्टी फर्स्टच्या जल्लोषाला एकादशीमुळे ब्रेक

■ भक्तीला वेग : हॉटेल व्यवसायावर होणार परिणाम

**सांगली : हॅलो प्रभात**




दरवर्षी जल्लोष,पार्टी आणि जल्लाद उत्साहात साजरा होणारा ३१ डिसेंबर यंदा मात्र संयम,श्रध्दा आणि साधेपणाचा संदेश देणारा ठरत आहे.मुळात यंदा ३१ डिसेंबर रोजी एकादशी तिथी आल्याने नववर्ष स्वागताच्या जल्लोषावर धार्मिक परंपरांचा प्रभाव स्पष्टपणे जाणवत असून, कवठेमहांकाळसह ग्रामीण भागातही वेगळेच चित्र पहायला मिळत आहे.३१ डिसेंबर हा वार बुधवारचा असल्याने अनेक नागरिकांनी तो शुभ मानत हॉटेल पार्टी,कौटुंबिक समारंभ, मित्रमंडळींसोबत सेलिब्रेशन तसेच पर्यटनाचे नियोजन आधीच केलेले होते.मात्र एकादशीच्या दिवशी मांसाहार व मद्यपान टाळण्याची परंपरा हिंदू संस्कृतीत चांगलीच दृढ झालेली असल्याने अनेकांचे नियोजन ऐनवेळी बदलावे लागल्याची चर्चा ऐकावयास मिळत आहे.यात व्यावसायिक मात्र चांगलेच नाराज झाले आहेत. परिणामी,अनेक कार्यक्रम रद्द झाले असून काही कार्यक्रम हे ३० डिसेंबर किंवा १ जानेवारी रोजी हलविण्यात आल्याचेही बोलले जात आहे.याचा थेट परिणाम हॉटेल,ढाबे,रिसॉर्ट, क्लब आणि खानावळ व्यवसायावर झाल्याचेही व्यावसायिकांकडून सांगण्यात येत आहे. अनेक ठिकाणी आधीच झालेली बुकिंग रद्द झाली असून, अपेक्षित गर्दी न झाल्याचे लक्षात येताच व्यावसायिक नाराजी व्यक्त करत आहेत. 'ड्राय डे' जाहीर नसतानाही केवळ धार्मिक कारणांमुळे ग्राहक संख्येत मोठी घट होणार असल्याचे व्यावसायिकांचे म्हणणे आहे.काही हॉटेल व खानावळ चालकांनी परिस्थितीशी जुळवून घेत शाकाहारी विशेष मेनू, उपवासाचे पदार्थ तसेच कौटुंबिक वातावरणावर भर देण्याचा बहुतांश निर्णय घेतल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र तरीही दरवर्षी मिळणाऱ्या व्यवसायाच्या तुलनेत यंदा उलाढाल घटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.या पार्श्वभूमीवर तरुणाईमध्ये संमिश्र प्रतिक्रिया उमटताना दिसत आहेत. काहींनी सोशल मीडियावर विनोदी पोस्टद्वारे नाराजी व्यक्त केली असली तरी अनेकांनी एक दिवस संयम पाळण्यात काहीच हरकत नाही, अशी समजूतदार भूमिका घेतल्या आहेत.जल्लोषाला मर्यादा आल्या असल्या तरी सांस्कृतिक व धार्मिक मूल्यांचे जतन होत असल्याचे समाधानही काहीजणा कडून व्यक्त केले जात आहे.एकूणच,यंदाचा ३१ डिसेंबर कवठेमहंकाळ तालुक्यात जल्लोषापेक्षा संयम,श्रध्दा आणि साधेपणाचा संदेश देणारा ठरत असून,नववर्षाचे स्वागत भक्तीभावात होणार असल्याचे चित्र सध्या स्पष्ट होत आहे.भक्तीचा रंग गडद दुसरीकडे,एकादशीनिमित्त शहरातील तसेच ग्रामीण भागातील मंदिरांमध्ये भाविकांची गर्दी वाढण्याची शक्यता आहे. उपवास,भजन,कीर्तन,हरिनाम सप्ताह तसेच विठ्ठल नामस्मरणासाठी अनेक भाविक सज्ज झाले आहेत.नवीन वर्षाची सुरुवात संयम,भक्ती आणि सकारात्मक विचारांनी व्हावी, अशी भावना मोठ्या प्रमाणावर तालुक्यातील नववर्षाच्या प्रेमींनी व्यक्त होताना दिसत आहे.

## देवळाली प्रवरात उद्या पासून साई नामाचा गजर

■ प्रख्यात कीर्तनकारांची कीर्तने होणार

**देवळाली प्रवरा : हॅलो प्रभात**




येथील श्री साई प्रतिष्ठाणच्यावतीने प्रतिवर्षाप्रमाणे गुरुवार १ ते ८ जानेवारी २०२५ दरम्यान श्री साई सच्चरित्र पारायण सोहळा व भव्य कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. गेल्या ११ वर्षापासून श्री साई प्रतिष्ठान देवळाली प्रवरा व देवळाली ग्रामस्थांच्यावतीने महंत उद्धव महाराज मंडलिक यांच्या अधिपत्याखाली साई पारायण व कीर्तन महोत्सवचे आयोजन करण्यात येते. यंदाचे १२ वे वर्ष तथा तपपूर्ती साई उत्सवास १ जानेवारी रोजी प्रारंभ होणार असून सांगता ८ जानेवारी रोजी होणार आहे . गुरुवार १ जानेवारी रोजी सकाळी ७ वाजता कलश पूजन व ग्रंथ पूजन होईल. त्यानंतर पारायण वाचनास सुरुवात होणार आहे. या या उत्सवानिमित्त सकाळी ४.३० वा, काकड आरती, सकाळी ८ ते १२ साई सच्चरित्र पारायण ,माध्यन्ह आरती ,सायंकाळी ४ वाजता हरिपाठ , सायंकाळी ६ वाजता धूप आरती व त्यानंतर ७ ते रात्री ९ वाजेपर्यंत कीर्तन, शेज आरती व नंतर महाप्रसाद होईल. पारायण व्यासपीठ चालक गणेश महाराज मुसमाडे हे आहेत.उत्सवाच्या काळात हजारो भाविकांसाठी सकाळी नाश्ता तर दुपार व रात्री महाप्रसादाचे अन्नदात्यांच्या सहकार्याने आयोजन केले आहे. कीर्तन महोत्सवानिमित्त ०१ जानेवारीला भागवत महाराज उंबरेकर, ०२ जानेवारी रोजी कान्होबा महाराज देहूकर(पंढरपूर), ३ जानेवारीला उल्हास महाराज सूर्यवंशी, ४ जानेवारी उमेश महाराज दशरथे,

५ जानेवारी रोजी एकनाथ महाराज चत्तर, ६ जानेवारीला युवराज महाराज देशमुख, ७ जानेवारी रोजी ज्ञानेश्वर महाराज शिंदे(माऊली) यांची किर्तनसेवा संपन्न होणार आहे. ८ जानेवारी रोजी सकाळी ९ ते ११ महंत उद्धव महाराज मंडलिक(नेवासेकर) यांचे काल्याचे कीर्तन व त्यानंतर भव्य महाप्रसादाने उत्सवाची सांगता होणार आहे. तरी या पंचक्रोशीतील जास्तीत जास्त भाविकांनी पारायण वाचनास बसावे त्यासाठी ग्रंथ उपलब्ध करून दिले जातील असे आवाहन श्री साई प्रतिष्ठान व शहरवासीयांनी केले आहे.

## सरलेल्या वर्षात रिअल इस्टेट क्षेत्रात ४.४६ लाख कोटींची उलाढाल

**नवी दिल्ली : हॅलो प्रभात**

सरलेल्या वर्षात रिझर्व बँकेने व्याजदरात विविध टप्प्यात सव्वा टक्क्याची कपात केली आहे. यापैकी व्यवसायिक बँकांनी ग्राहकांना 0.32 टक्क्यांचा लाभ अगोदरच दिला आहे. मात्र सरलेल्या वर्षात घर विक्री संख्येत कमी मात्र मूल्यात जास्त झाल्याची आकडेवारी विविध मूल्यांकन करणाऱ्या संस्थांनी जाहीर केली आहे. स्क्वेअर यार्ड या संस्थेने सांगितले की 25 डिसेंबरपर्यंत घर विक्री पाच टक्क्यांनी कमी होऊन 5.45 लाख युनिट झाली आहे. ही आकडेवारी देशातील नऊ मोठ्या शहरासंदर्भातील आहे. मात्र या वर्षात घर विक्रीचे मूल्य अकरा टक्क्यांनी वाढून 4.46 लाख कोटी रुपये झाले आहे. याकडेवारीसाठी पुणे, ठाणे, मुंबई, नवी मुंबई, बंगलोर, हैदराबाद, नोएडा, ग्रेटर नोएडा, गाजियाबाद या शहरांचा विचार केला आहे. यासाठी पहिल्यांदा विकलेल्या आणि फेरविक्री केलेल्या घरांची आकडेवारी विचारात घेण्यात आली आहे. या संस्थेने सांगितले की, 2024 मध्ये 5.77 लाख कोटी घरांची विक्री 4.03 लाख कोटी रुपयांना झाली होती. या संस्थेचे संस्थापक तनुज शौरी यांनी सांगितले की, काही लोकांच्या उत्पन्नात जास्त वेगाने वाढ झाली आहे. त्या लोकांनी जास्त किमतीची घरे विकत घेतली असल्याचे दिसून येते.

## उस वाहतुकदार चालकांनी सुरक्षीत वाहतुकीला प्राधान्य द्यावे : अनिल दुर्गे

**कोपरगाव : हॅलो प्रभात**



कारखानदार, उस उत्पादक शेतकरी आणि वाहतुक यामधील महत्वाचा दुवा उस वाहतुकदार चालकांचा असुन, जुगाडाद्वारे होणा-या वाहतुकीतुन अपघातांचे प्रमाण वाढत आहे तेव्हा उस वाहतुकदार चालकांनी रस्ते सुरक्षेचे सर्व नियमांची काटेकोर अंमलबजावणी करून सुरक्षीत वाहतुकीला प्राधान्य द्यावे असे प्रतिपादन श्रीरामपुर कार्यालयाचे पोलिस उप वाहन निरीक्षक अनिल दुर्गे यांनी केले.

सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर उस वाहतुक करणा-या बैलगाडी, ट्रक, ट्रॅक्टर, जुगाड चालक मालक यांचे एकदिवसीय सुरक्षा शिबीर घेण्यांत आले त्याप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मुख्य शेतकी अधिकारी एन. डी. चौधरी होते.

प्रारंभी उप मुख्य शेतकी अधिकारी सी. एन. वल्टे प्रास्तविक करतांना म्हणाले की, संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे, कारखान्याचे अध्यक्ष विवेक भैय्या कोल्हे, उपाध्यक्ष राजेंद्र कोळपे, कार्यकारी संचालक सुहास यादव, साखर सरव्यवस्थापक शिवाजीराव दिवटे यांनी रस्त्यावरून उस वाहतुक करणा-या सर्व वाहनधारकांच्या व्यक्तीगत सुरक्षे बरोबरच मोफत आरोग्य तपासणीचीही काळजी घेत असल्याचे सांगितले. कारखान्याचे सुरक्षा अधिकारी रमेश डांगे यांनी सर्व वाहनधारकांना कापडी रिफलेक्टर कारखाना यंत्रणेमार्फत उपलब्ध करून दिल्याचे यावेळी बोलताना सांगितले. अनिल दुर्गे पुढे म्हणाले की, श्रीरामपुर वाहन कार्यालयाचे मोटारवाहन निरीक्षक निरंजनसिंग परदेशी यांनी जिल्हयात प्रत्येक साखर कारखान्याच्या उस वाहतुकीचे सुयोग्य पध्दतीने नियोजनाबाबत आढावा घेवुन वाहन विभागाच्या सर्व अधिका-यांना सुचना व उपाययोजनाबाबत माहिती दिली आहे. सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावरील उस वाहतुक करणा-या सर्व वाहनधारकांनी रस्त्यावरून उसाची कारखान्यापर्यंत ने आण करतांना आवश्यक ती काळजी घ्यावी, वाहतुकीदरम्यान कर्णकर्कश गाणी वाजवु नये, क्षमतेपेक्षा जादा उसाची वाहतुक करू नये, बैलगाडीस दर्शनी भागावर तर ट्रक, ट्रॅक्टर, ट्रॉली, जुगाड यांच्या मागील बाजुस कापडी रिफलेक्टर अवश्य लावावे जेणेकरून रात्री अपरात्री वाहतुक करतांना होणारे अपघात टाळता येतील. ट्रॅक्टर जुगाडातुन उस वाहतुकीदरम्यान रस्त्यावरील अपघातांचे प्रमाण जास्त आहे. त्याबाबत १ जानेवारी पासुन कडक नियमांची अंमलबजावणी केली जाणार असून सुरक्षित उत्सवात केला प्राधान्य देण्यात येणार आहे तेंव्हा सर्वांनी वाहतुकीचे नियम पाळावे. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन केनयार्ड सुपरवायझर दिपक जगताप, दशरथ भवर व त्यांच्या सर्व सहका-यांनी केले. सुरक्षा अधिकारी रमेश डांगे यांनी आभार मानले.

## पतसंस्थांचा ३५ वर्षांचा विश्वास म्हणजे राज्य फेडरेशन

■ काका कोयटे

**कोपरगाव : हॅलो प्रभात**



महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या स्थापनेला यंदा ३५ वर्षे पूर्ण झाली असून, या कालावधीत राज्यातील सहकारी पतसंस्थांचा विश्वासार्ह आधार म्हणून राज्य फेडरेशनने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. फेडरेशनच्या एकूण प्रवासातील तब्बल १८ वर्षे अध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळण्याची संधी मिळाली, हा माझ्यासाठी गौरवाचा क्षण असल्याचे मत महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचा ३५ वा वर्धापन दिन राज्य फेडरेशनच्या आढावा बैठकीत अध्यक्ष काका कोयटे व संचालक मंडळाच्या प्रमुख उपस्थितीत केक कापून उत्साहात साजरा करण्यात आला. त्या वेळी ते बोलत होते.

राज्य फेडरेशनच्या स्थापनेपासून संचालक, सहसचिव, महासचिव ते अध्यक्ष असा प्रवास करताना राज्यभरच नव्हे, तर देश-विदेशात सहकारी चळवळीतील असंख्य सहकारी मिळाले, हीच माझी खरी संपत्ती असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच राज्यातील सहकारी पतसंस्थांची शिखर संस्था म्हणून गेली ३५ वर्षे राज्य फेडरेशन विश्वासार्हपणे कार्यरत असल्याचेही काका कोयटे यांनी सांगितले.

यावेळी राज्य फेडरेशनचे महासचिव शशिकांत राजोबा म्हणाले की, राज्य फेडरेशनने काका कोयटे यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील १६ हजारांहून अधिक सहकारी पतसंस्थांना आर्थिक शिस्त लावण्याचे महत्त्वपूर्ण काम करून राज्यातील सहकारी पतसंस्था चळवळ बळकट बनविली आहे. तर उपाध्यक्ष डॉ. शांतीलाल शिंगी यांनी सांगितले की, काका कोयटे यांच्या सक्षम नेतृत्वामुळे सहकारी पतसंस्था चळवळ अधिक मजबूत झाली आहे. सहकारी पतसंस्थांच्या विविध समस्या व मागण्यांसाठी केंद्र व राज्य शासनाकडे प्रभावी पाठपुरावा करत आंदोलने व मोर्चे काढण्यात आले.